# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ०९.०८.२०१२ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

गुरूवार दिंनाक ०९.०८.२०१२ (का.प.क्र.४६)रोजी मा.महापौर सौ.अनिता नंदकुमार घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दु१२.५० वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.पुरूषोत्तम भापकर,भा.प्र.से., नगर सचिव श्री.रविंद्र निकम तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे पालीका सदस्य उपस्थित होते.

१. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
२. स.स. विकास रतनलाल जैन
३. स.स. रेणुकादास दत्तोपंत वैद्य
४. स.डॉ.खान जफर अहेमद
५. स.स.श्री.बन्सी ग्यानु जाधव
६. स.स.श्रीमती सुरे सविता संतोष
७. स.स.श्रीमती वाघमारे ज्योती रुपचंद
८. स.स.श्री.जाधव ज्ञानोबा पांडुरंग
९. स.स.श्री.बनकर कृष्णा सांडुजी
१०. स.स.श्रीमती वाणी सावित्रीबाई हिरालाल
११. स.स.श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे
१२. स.स.श्री.बेहडे अशोक किसनराव
१३. स.स.डॉ.खान नुझत तरन्नुम खान उमर
१४. स.स.श्रीमती खील्लारे ज्योती रमेश
१५. स.स.श्री.भुईगळ अमित सुधाकर
१६. स.स.श्रीमती अहिरे संगिता राजु
१७. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१८. स.स.श्री.नागरे किशोर बाबुराव
१९. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
२०. स.स.सौ.उर्मिला नितीन चित्ते
२१. स.स.श्री.अनिल जुगललाल जैस्वाल
२२. स.स.श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत
२३. स.स.श्री.चौधरी संजय सांडू
२४. स.स.श्री.शिंदे राजू रामराव
२५. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ

२६. स.स.श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश
२७. स.स.श्री.खान जहांगीर अब्बास
२८. स.स.श्रीमती तोतला प्रिती संतोषकुमार
२९. स.स.श्रीमती राजपूत प्राजक्ता विश्वनाथ
३०. स.स.श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
३१. स.स.श्री.अनिल श्रीकिसन मकरिये
३२. स.स.श्रीमती कविता संजय जाधव
३३. स.स.श्री.सिध्द जगदिश कन्हैय्यालाल
३४. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
३५. स.स.श्री.अफसरखान यासीन खान
३६. स.स.श्रीमती फिरदोस फातेमा खान
३७. स.स.श्री.मोहम्मद मुजीबउद्दीन कदिरोद्दीन
३८. स.स.श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम
३९. स.स.श्री.गादगे विरभद्र रामलींग
४०. स.स.श्रीमती रेखा अजित जैस्वाल
४१. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४२. स.स.श्रीमती सय्यद मेहरुन्निसा खाजा
४३. स.स.श्री.शहनवाज खां रहेमान
४४. स.स.श्री.शेख हबीब शेख छोटु कुरेशी
४५. स.स.श्रीमती रेणुका कृष्णा वाडेकर
४६. स.स.श्रीमती सोनवणे सुनिता सुनिल
४७. स.स.श्री.नासेरखान अब्दुल रहेमानखान
४८. स.स.श्री.समीर सुभाष राजुरकर
४९. स.स.श्री.बबन पंडितराव नरवडे
५०. स.स.श्री.वाघचौरे विजय लक्ष्मण
५१. स.स.श्री.मधुकर दामोधर सावंत
५२. स.स.श्री.तुपे त्रिंबक गणपतराव
५३. स.स.श्रीमती काळे शोभा पुखराज
५४. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
५५. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र मानीकराव
५६. स.स.श्रीमती कला रविनंदन ओझा
५७. स.स.श्रीमती निरपगारे पुष्पा कांतीलाल
५८. स.स.श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड
५९. स.स.श्रीमती गांगवे कौशल्याबाई बन्सीलाल

६०. स.स.श्रीमती घडमोडे सविता भगवान
६१. स.स.श्री.कावडे रवि साहेबराव
६२. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६३. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
६४. स.स.श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
६५. स.स.श्री.दिग्विजय संभाजी शेरखाने
६६. स.स.श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव
६७. स.स.श्री.भारसाखळे पंकज रामचंद्र
६८. स.स.श्री.खेडकर सुशिल तुकाराम
६९. स.स.श्री.निमंगावकर प्रल्हाद गणपतराव
७०. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७१. स.स.श्रीमती सुरडकर साधना गणेश
७२. स.स.श्री.खान अक्रम करीम खान
७३. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
७४. स.स.श्रीमती सुनिता भारत बरथुने
७५. स.स.श्रीमती मोरे आशाबाई राजेश
७६. स.स.श्री.गायकवाड रावसाहेब धोंडीराम
७७. स.स.श्रीमती वेताळ छाया शाईनाथ

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्य</u>**

०१. स.स.श्री.कुलकर्णी गोपाळ शरदराव
०२. स.स.श्री.मालानी प्रफुल्ल लालचंद
०३. श्रीमती पाटील रेखा दिनकरराव
०४. स.स.श्री.अभिजित भास्करराव देशमुख
०५. श्रीमती हेमलता प्रकाश मुगदिया

**<u>चर्चा:</u>**

श्री.अफसर खॉन :माझ्या वार्डात नाल्याची साफसफाई झाली नाही काही प्रमाणात कचरा काढला होता तोही उचलला नाही या बाबत आदेशीत करावे व का साफसफाई केली नाही कार्यवाही करावी.

श्री.सुशिल खेडकर :इतर अनेक विषयावर चर्चा करायची आहे अगोदर विषय घ्यावेत.

श्री. राजू शिंदे : एक महिण्यापूर्वी मा.महापौर,मा.आयुक्त यांनी एमआयडीसी चिकलठाणा भागात विकास कामा बाबत पाहणी केली उद्योजकाच्या कार्यालयात सत्कार सुध्दा केला. तेथे डिफर मधील कामे केली परंतु आता बरीच कामे बंद पडलेली आहे एमआयडीसी मधून ९ महिण्यात एलबीटी ४७ कोटी व मालमत्ता कर व इतर माध्यमातून असे एकूण ६१ कोटी मिळाले या वर्षात आणखी १०-१५ कोटीची वाढ होईल. जे उर्वरीत रस्ते राहिलेले आहे पुर्णच रस्ते विकसीत करावे असे म्हणणार नाही पुर्ण रस्ते विकसीत करण्यासाठी ५०-६० कोटी खर्च लागणार आहे परंतु जे महत्वाचे रस्ते आहे काही लाईटची कामे आहे जसे कलाग्राम चा रस्ता राहिला व इतर रस्ते करण्याचे आपण आश्वासन दिले लहान मोठी दुरूस्त करावे लागणार

आहे मसिआच्या लोकांनी सुध्दा या वर्षात १०-१५ कोटी रूपये कराच्या माध्यमातून वाढवून देवू असे म्हटले.यामध्ये जे काही वाढीव काम करावे लागणार त्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करावी व या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्याचे आदेशीत करावे व येणा-या वर्षात सन २०१३ मधे या भागातील १०० टक्के एलबीटीतून उत्पन्न मिळेल तसेच एमआयडीसी भागातून जे उत्पन्न होईल त्यांचे १० टक्के रक्कम बजेटमध्ये तरतूद करावी.

मा.महापौर :स.श्री.राजू शिंदे यांनी मागणी केल्यानुसार एमआयडीसी चिकलठाणा भागात रस्त्याची व विद्युत पथदिवे लावणे बाबतची कामे त्वरीत करण्यात यावी. औद्योगीक क्षेत्रातुन एलबीटीच्या माध्यमातून मिळणारे उत्पन्नातील दहा टक्के रक्कम या भागात विकास करण्यासाठी अर्थसंकल्पात तरतुद करण्यात यावी. तसेच कलाग्रामचा रस्ता करण्यासाठी त्वरीत अंदाजपत्रक तयार करण्यात यावे सदरील कामासाठी आर्थीक तरतुद अर्थसंकल्पामध्ये करण्यात येईल.

श्री.मीर हिदायत अली :ऐनवेळी किती विषय आलेले आहे त्याची प्रत आम्हाला मिळाली नाही ऐनवेळी विषय घेवू नये.

**<u>विषय क्रमांक८२८:</u>**

दिनांक २०.१२.२०११ (कार्यक्रम पत्रिका क्र.३२) व दिनांक ११.०१.२०१२ रोजी (कार्यक्रम पत्रिका क्र.३३) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**<u>ठराव :</u>**

दिनांक २०.१२.२०११ (कार्यक्रम पत्रिका क्र.३२) व दिनांक ११.०१.२०१२ रोजी (कार्यक्रम पत्रिका क्र.३३) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत कायम करण्यास मंजुरी देण्यांत येते.

**<u>विषय क्रमांक ८२९:</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेतील विविध विभागांना आवश्यक असणारी स्टेशनरी,छपाई,साहित्य संगणक साहित्य, प्रभाग कार्यालयातील आवश्यक स्वच्छता साहित्य हे खरेदी करावयाचे आहे. मागील वर्षी महानगरपालिकेची आर्थिक स्थिती चांगली नसल्याने सदर साहित्य खरेदी करण्यात आले नाही. केवळ स्टेशनरी साहित्यातील काही Items घेऊन वेळ भागविण्यात आली. दोन वर्षापासुन साहित्य खरेदी केले नसल्याने साहित्याचा अत्यंत तुटवडा निर्माण झालेला आहे. सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी साहित्य खरेदीसाठी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | साहित्याचा प्रकार | एकुण संख्या |
|---|---|---|
| ०१ | लेखन/संगणक साहित्य | १५ लक्ष |
| ०२ | छपाई साहित्य | १० लक्ष |
| ०३ | स्वच्छता सहित्य | २० लक्ष |
| ०४ | कार्बोलिक पावडर व फिनेल | १० लक्ष |
| ०५ | बाईंडींग | ०२ लक्ष |
| ०६ | अभिलेख कक्ष फवारणी | ०१ लक्ष |
| ०७ | ड्रेनेज बांबु साहित्य | ०४ लक्ष |

सदर साहित्य खरेदीकरीता विहीत पध्दतीने खरेदी करण्याची कार्यवाही करण्यांत येईल. तसेच झेरॉक्स मशीन साहित्य हे वेळोवेळी व आवश्यकतेनुसार खरेदी करण्यात येईल.

करीता प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

श्री.संजय केनेकर :प्रत्येक वर्षी अशा प्रकारचा विषय यावा.हा विषय आला प्रशासनाचे अभिनंदन करतो.

श्री.त्रिंबक तुपे :प्रत्येक विभागात साहित्य वेळेवर मिळत नाही वर्षासाठीचे नियोजन असेल तर उशीरा असा प्रस्ताव का येतो. झोनमध्ये साहित्य मिळत नाही यामूळे बदनामी होते असे योग्य नाही तात्काळ साहित्य खरेदी करावे.

श्री.संजय जोशी :यात ७ क्रमांक बांबू खरेदी आहे बांबू खरेदी केल्यानंतर ते डायरेक्ट प्रत्येक झोनवाईज पोहविले तर त्या कर्मचा-यांना हेड ऑफिसला येण्याची गरज पडणार नाही.

श्री.संजय केनेकर :करोडो रूपयाची ड्रेनेजची कामे झाली त्या प्रमाणात बांबू खरेदी झाले नाही.

श्री.विजय वाघचौरे :बांबू व रॉड असे दोन्ही खरेदी करावे.

डॉ.जफर खान :वार्ड कार्यालयासाठी लागणारे साहित्य वार्ड अभियंता यांना खरेदी करण्याचे अधिकार देण्यात यावे.

मा.महापौर:- विषय मंजूर, प्रत्येक वार्ड कार्यालयात आवश्यक लेखा साहित्य वेळेवर पुरविण्यात यावे.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी साहित्य खरेदीसाठी खालील प्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षित असुन त्यास विहीत पध्दतीने खरेदी करण्याच्या कार्यवाहीस तसेच झेरॉक्स मशीन साहित्य हे वेळोवेळी व आवश्यकतेनुसार खरेदी करण्यास नियमाप्रमाणे मंजूरी देण्यात येते.

| अ.क्र. | साहित्याचा प्रकार | एकुण संख्या |
|---|---|---|
| ०१ | लेखन/संगणक साहित्य | १५ लक्ष |
| ०२ | छपाई साहित्य | १० लक्ष |
| ०३ | स्वच्छता सहित्य | २० लक्ष |
| ०४ | कार्बोलिक पावडर व फिनेल | १० लक्ष |
| ०५ | बाईंडींग | ०२ लक्ष |
| ०६ | अभिलेख कक्ष फवारणी | ०१ लक्ष |
| ०७ | ड्रेनेज बांबु साहित्य | ०४ लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक८३०:**

आयुक्त,प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद शहर हे ऐतिहासीक व औद्योगीक शहर असुन पर्यटनाच्या दृष्टीने जागतिक पातळीवर महत्वाचे शहर आहे. रेल्वे स्टेशन ते क्रांतीचौक हा रस्ता शहरातील मुख्य रस्ता असुन मंजुर विकास योजना आराखड्यानुसार ४०,०० मीटर रुंद व त्याची लांबी २५०० मीटर आहे. औरंगाबाद शहरात येणारे देशी/विदेशी पर्यटक तसेच औद्योगिक क्षेत्रातील संबंधीत अभ्यागत याच रस्त्यावरुन शहरात प्रवेश करतात. त्यानुषंगाने रस्ता पुर्णपणे विकसीत करुन नव्याने बांधणे आवश्यक आहे.

हा रस्ता सद्यस्थितीत मोठ्या प्रमाणात खराब झालेला आहे. या रस्त्यालगत जायकवाडी पासुन शहरास पाणीपुरवठा करणा-या १४०० व ७०० मी.मी. व्यासाच्या मुख्य जलवाहीन्या तसेच वितरण व्यवस्थेतील ३००,२५० व १०० मी.मी. इत्यादी व्यासाची जलवाहिन्या रस्त्यांतर्गत असुन त्यांचे देखभाल दुरुस्ती करीता रस्ता अनेक वेळा खोदण्यात येऊन नंतर त्याचे डांबरी पॅचवर्क करण्यात आले आहे व अशाच स्थितीत सध्या रस्त्यावर वाहतुक सुरु आहे.

सदर रस्त्यावरील मंजुर विकास योजना आराखड्यानुसार बाधीत मिळकती बहुतांश ठिकाणी निष्काषीत करण्यात आलेल्या आहेत त्यामुळे रस्ता विकास योजना (४० मीटर रुंद) नुसार पुर्णतः विकसीत करणे आवश्यक आहे.

डिफर्ड पेमेंट अंतर्गत (सन-२०११-१२) औरंगाबाद शहरातील विविध विकास योजना रस्ते विकसीत करणे या कामाची रुपये ३०.०० कोटी रक्कमेची निविदा मंजुर असुन या अंतर्गत रेल्वेस्टेशन ते हॉटेल वेंदात या रस्त्याचे अस्तित्वात असलेल्या रुंदीत (दोन्ही बाजुने) डांबरीकरण करणे, साईड ड्रेन करीता नाली बांधणे व हॉटेल वेदांत ते एस एस सी बोर्ड या रस्त्याचे Concrete Pavement,२ मीटर डांबरी रस्ता व साईड ड्रेन करीता आर सी सी नाली बांधणे इत्यादी कामाचा समावेश असुन या करीता एकुण रक्कम रुपये ७.२८९ कोटी रक्कम मंजुर आहे.

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या सुवर्ण जयंती निमित्त घ्यावयाचे उपक्रमांतर्गत सुवर्ण जयंतीपथ म्हणुन एक रस्ता विकसीत करण्याचा समावेश असुन या अंतर्गत रेल्वेस्टेशन ते क्रांतीचौक हा रस्ता पुर्णपणे २५०० मीटर लांब व ४० मीटर रुंद विकसीत करण्याचा प्रस्ताव आहे. डिफर्ड पेमेंट धर्तीवर रेल्वेस्टेशन ते कोकणवाडी चौक १३०० मीटर लांब व ४० मीटर रुंद रस्ता पुर्णपणे विकसीत करणे करीताच्या कामाच्या सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रुपये १३,५३,४८,२०५/- चे तयार करण्यात आले असुन यामध्ये रस्त्याचे कॉंक्रीटीकरण,डांबरीकरण, युटीलीटी कॉरीडोर,साईड ड्रेन,फुटपाथ इत्यादी बाबींचा समावेश करुन रस्ता विकसीत करण्यात येणार आहे. या कामासाठी मुळ कामांमध्ये रक्कम रुपये ७.२८९/- कोटींची तरतुद मंजुर आहे. आता उर्वरीत काम करण्यासाठी रक्कम रुपये ६.२५ कोटीची रक्कमेची आवश्यकता आहे.

त्यानुसार कोकणवाडी चौक ते रेल्वेस्टेशन या रस्त्याचे डिफर्ड पेंमेट धर्तीवर कॉंक्रीट रस्ता, डांबरीकरण रस्ता व युटीलीटी कॉरीडोर, फुटपाथ, साईड ड्रेन कामे करण्यासाठी रक्कम रुपये ६.२५ कोटींची वाढीव तरतुद मान्य होण्यासाठी तसेच प्रस्तावित काम हे यापुर्वी मंजुर असलेल्या निविदा दरानेच मुळ गुत्तेदाराकडुन करुन घेण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी मिळणे योग्य.

करीता उपरोक्त नुसार कोकणवाडी चौक ते रेल्वेस्टेशन १३०० मीटर लांब या रस्त्याचे पुर्णपणे विकास करणे करीताचे कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु.१३,५३,४८,२०५/- मंजुर करणे व सदरील काम यापुर्वी मंजुर असलेल्या मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र.२४२ दि.१५.०४.२०११ नुसार मे.जी.एन.आय.इंन्फ्रास्ट्रक्चर या मुळ गुत्तेदाराकडुन करुन घेण्याच्या मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद:**

श्री.काशिनाथ कोकाटे :प्रशासनाच्या वतीने खुलासा घ्यावा.

श्री.प्रमोद राठोड :ठेकेदारास ही निविदा देण्याचे सांगितले आहे ही पध्दत बरोबर आहे का नियमानुसार आहे का मा.आयुक्तांचा खुलासा घ्यावा.

श्री.समीर राजूरकर :१० लक्षचे काम वाढीव ११ लक्षचे झाले तर १ लक्षसाठी निविदा मागवतो.परंतू यात ठेकेदाराचे नांव दिले.कोणत्या नियमाप्रमाणे बसते.

श्री.मीर हिदायत अली :टाऊन हॉल ते चेलीपूरा पर्यत रस्त्याचे काम झाले चेलीपूरा ते रोषनगेट पर्यंतचे ८-१० लक्षचे काम बाकी आहे ३ महिण्यापासून पाठपुरावा करतो काम होत नाही आणि या प्रस्तावानुसार ३० कोटीचे काम लगेच कसे देवू शकतो.खुलासा करावा.

श्री.अफसर खान :बिबीका मकबरा रस्त्याचे काम चालू होते तसेच आझाद चौक ते चप्पा चौक पर्यंतच्या रस्त्याचे चालू काम का बंद केले विकास कामास विरोध नाही खुलासा करावा.

डॉ.जफर खान :अशा प्रकारचे रस्ते ऑलरेडी करतो आहे. प्रस्ताव कसा कुणाच्या दबावाखाली आला मोढा भागातील रस्त्याची दुरावस्था झाली जुना मोंढा चप्पा चौक भागातील रस्ते अशा प्रकारचे का हाती घेत नाही.

श्री.मिलींद दाभाडे :अचानक कॉक्रेटींग करण्याचा प्रस्ताव आला कसा पर्यटक क्रांतीचौक मार्गे शहरात येतात खुलासा करावा.

डॉ.नुझत तरन्नुम खान :माझ्या वार्डात ५-७ लक्षचे काम होत नाही दोन वर्षात कामे केली नाही अचानक एकाच रस्त्यासाठी ३० कोटीचे काम करणे योग्य नाही.

शहर अभियंता :रेल्वेस्टेशन ते वेंदात हॉटेल व वेंदात हॉटेल ते कोकणवाडी तसेच एसएससी बोर्ड पर्यत डिफर पेमेंन्टवर मागिल वर्षी या रस्त्याचे काम हाती घेतले होते त्यासाठी ७.२८ कोटीची तरतूद मंजूर झाली होती आता धोरणात्मक असा निर्णय झाला की रेल्वेस्टेशन ते क्रांतीचौक हा अडीच कि.मी रस्ता हा संपूर्णपणे कॉक्रेटींग करायचा डिफर पेमेंन्ट वर मंजूर रस्त्यात डांबरीकरण व कॉक्रेटींग असे दोन्ही भाग होते त्यास संपूर्ण कॉक्रेटींग करण्यासाठी रिवाईज अंदाजपत्रक

तयार करण्यात आले आणि जे अंदाजपत्रक जास्तीचे आहे ते फक्त अस्तित्वात असलेल्या रस्त्यासाठी होते परंतु तो पुर्ण रस्ता आता डीपी प्लॅन प्रमाणे ४० मी. ताब्यात आला आहे.त्यामूळे त्यास ४० मी. प्रमाणे विकसीत करायचे व पुर्ण कॉक्रेंटीग करायचे आहे त्यासाठी ६.२५ ,यात २२ कोटी अतिरिक्त लागणार होते.दोन एजन्सीकडे एकाच रस्त्याचे काम जात होते म्हणून सुधारीत प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात आला.

श्री.अफसर खान :वार्डातील रस्त्याचे कामे चालू होती ती का बंद झाली.चेलीपूरा चप्पाचौक भागात मोठमोठे खड्डे पडलेले तेथे काम होत नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे :यापूर्वी एका एजन्सीला काम दिले त्यावेळी हा संपूर्ण रस्ता डीपी रोड अस्तित्वात नव्हता का ?

शहर अभियंता :रस्ता अस्तित्वात होता ताब्यात ४० मी. ताब्यात घेतला

श्री.काशिनाथ कोकाटे :त्याच एजन्सीला काम दयायचे अशा प्रकारे कसा प्रस्ताव मंजूर करून घेत आहे.एजन्सी कोणती आहे दर त्यावेळचे काय होते नियम काय होते किती अबाऊने काम दिले तरतुद काय होती आणि हे कामात काय बदल होणार आहे नियमाने कॉम्पीकेशन होवून काम व्हावे किती अबाऊ मध्ये काम या एजन्सीकडून करून घेत आहोत.

शहर अभियंता : डिफर पेमेंन्टवर २०११-१२ मध्ये अर्धा रस्त्याचे काम घेतले अर्धा रस्त्याचे काम वेगळे काढू शकत नव्हतो.पुढील रस्त्यासाठी लिगल कॉम्पीकेशन झाले असते. यानंतर सभागृह जे ठरवेल त्याप्रमाणे होईल.

श्री.समीर राजूरकर :धोरणात्मक निर्णय सभागृहात व्हावा. ६ कोटीचे विदाऊट टेंडर केले व कोणी मा.न्यायालयात गेले तर अडचणीचे होईल. आमची इच्छा नाही.परस्पर धोरण कुणी ठरवू नये.नियमाने करावे.

श्री.प्रमोद राठोड :नियमानुसार हे काम देत आहोत का त्याच एजन्सीकडून का दयायचे आहे मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

श्री.गजानन बारवाल :मा.आयुक्त यांनी शहरातील अनेक रस्त्याची कामे या प्रमाणे सुरू केली हाही रस्ता महत्वाचा आहे मंजूर करावे.

डॉ.जफर खान :अल्पसंख्याक व इतर भागातील रस्ते कामे कोणत्या कारणास्तव थांबविले.

शहर अभियंता :कामे थांबविलेली नाही चालू आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :शहरात प्रायोगिक तत्वावर २-४ मुख्य रस्ते कॉक्रेटींग करावे असे १०-१५ वर्षापासून चर्चा होती स.श्री.संजय सिरसाट यांनी ही भुमिका मांडली होती दुर्दैवाने महानगरपालिका चांगले काम करते हे दाखविण्याची संधी असतांना ती गमवू नये अशी सर्वांना विनंती.आता अनेक स.सदस्यांनी मागणी केली की त्यांचे वार्डातील रस्त्याची कामे होत नाही त्याची मागणी रास्त आहे.सर्व वार्डात कामे व्हावी. आर्थीक परीस्थिती खराब असतांना शहरातील १० रस्त्याचे कॉक्रेटींकरण करण्याचे ठरविले दरवर्षी १-१ रस्ता घेवू असे केल्यास प्रत्येक भागातील रस्ते होतील.या शहरात पर्यटक येतात शहराचे सौदर्य चांगले असावे शहराचे सर्व प्रतिबिंब हे रस्त्यामध्ये केंद्रीत झालेले असेत त्यामूळे या रस्त्याचे काम हाती घेतले या रस्त्यात अमुक वार्डाचा भाग येतो याचा विचार कोणीही करू नये हा शहरात जाण्यासाठी महत्वाचा रस्ता आहे मध्यभागी आहे यास मंजूरी दयावी.

श्री.नासेर खान :२-४ वार्डासाठी ३० कोटी खर्च होत असेल व इतर वार्डात कामे होणार नसेल तर योग्य नाही.इतर वार्डात २५ लक्षचे काम लवकर होत नाही. या कामासाठी तरतूद आहे का.आमचा विरोध नाही परंतु सर्वच वार्डात विकास कामे व्हावी.

श्री.विजय वाघचौरे :अनेक वार्डातून हा रस्ता जातो मंजूर करावे.

श्री.समीर राजूरकर :विना टेंडर काम या एजन्सीला देवू शकतो का , काम होण्यास विरोध नाही टेंडर व्हावे.

श्री.नासेर खान :वार्ड क्र. ६० मध्ये दोन वर्षात किती कामे केली माहिती दयावी.

श्री.त्रिंबक तुपे :सर्व वार्डातील रस्त्याची विकास कामे व्हावी स.सदस्यांनी मागणी रास्त आहे. एकमताने ठराव मंजूर करावा तसेच शहरातील ज्या ज्या भगातील रस्त्याची मंजूर कामे आहे ती थांबवू नये याप्रमाणे आणखी रस्ते घ्यावे हा रस्ता अनेक वार्डातून जात आहे मंजूर करावे प्रत्येक वर्षी असे रस्ते घ्यावे.

श्री.मिलींद दाभाडे :विना टेंडर प्रस्ताव का आणला.असे काम देता येते का ?

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.काशिनाथ कोकाटे :शहराच्या विकासाला विरोध नाही यापूर्वी स्थायी समिती अस्तित्वात नव्हती म्हणून एजन्सी फिक्सींगचे प्रस्ताव या सभागृहात येत होते त्यावेळी एकमताने आम्ही मंजूरी दिली. आता एजन्सी फिक्सींगचा हा ठराव आहे असे माझे मत आहे तसा प्रस्ताव नसेल तर या सभागृहाची मंजूरी घेण्याची गरज काय?

शहर अभियंता :वाढीव रक्कम ६.२५ कोटीस मंजूरीसाठी ठराव आला वाढीव मंजूरी घेतो आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :वाढीव रक्कमेला मंजूरी मिळेल एजन्सील फिक्सीला मंजूरी देत नाही

श्री.मिलींद दाभाडे :हा विषय रद्य करावा टेंडर काढावे.

श्री.समीर राजूरकर :विकास करण्यास विरोध नाही परंतु विना टेंडर प्रस्ताव का आला असे काम करू शकतो का माहिती दयावी.

मा.उपमहापौर :यास कुणाचाही विरोध नाही परंतु जो प्रस्ताव प्रशासनाने ठेवला तो चुकीचा पध्दतीने ठेवला जे वाढीव ६.२५ कोटीचे प्रस्ताव ठेवला तो रद्य करावे बाकीचे मंजूर करावे.

श्री.रेणुकादास वैद्य : सभागृहाचे मत लक्षात घेता याची निविदा प्रक्रिया करून पुढील सभेत आणावे.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

मा.महापौर : या विषयाच्या बाबतीत निविदा काढण्यात येतील. वाढीव तरतुदीनुसार हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या सुवर्ण जयंती निमित्त घ्यावयाचे उपक्रमांतर्गत सुवर्ण जयंतीपथ म्हणुन रेल्वेस्टेशन ते क्रांतीचौक हा २५०० मीटर लांब व ४० मीटर रुंद रस्त्यापैकी डिफर्ड पेमेंट धर्तीवर रेल्वेस्टेशन ते कोकणवाडी चौक १३०० मीटर लांब व ४० मीटर रुंद रस्ता पुर्णपणे विकसीत करणेच्या कामासाठी तयार केलेले सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रुपये १३,५३,४८,२०५/- चे अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. या कामासाठी मुळ कामांमध्ये रक्कम रुपये ७.२८९/- कोटींची तरतुद मंजुर असुन उर्वरीत कामासाठी रक्कम रुपये ६.२५ कोटीच्या वाढीव रक्कमेस व या कामासाठी निवीदा मागवुन नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक८३१:**

आयुक्त, प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद शहर हे ऐतीहासीक व औद्योगिक शहर असुन पर्यटनाच्या दृष्टीने जागतिक पातळीवर महत्वाचे शहर आहे. रेल्वे स्टेशन ते क्रांतीचौक हा रस्ता शहरातील मुख्य रस्ता असुन मंजुर विकास योजना आरखड्यानुसार ४०.०० मीटर रुंद व त्याची लांबी २५०० मीटर आहे. औरंगाबाद शहरात येणारे देशी / विदेशी पर्यटक तसेच औद्योगिक क्षेत्रातील संबंधीत अभ्यागत याच रस्त्यावरुन शहरात प्रवेश करतात. त्यानुषंगाने रस्ता पुर्णपणे विकसीत करुन नव्याने बांधणे आवश्यक आहे.

हा रस्ता सद्यस्थितीत मोठ्या प्रमाणात खराब झालेला आहे. या रस्त्यालगत जायकवाडी पासुन शहरास पाणीपुरवठा करणा-या १४०० मी.मी व्यासाच्या मुख्य जलवाहिन्या तसेच वितरण व्यवस्थेतील

३००,२५० व १०० मी.मी इत्यादी व्यासाची जलवाहिन्या रस्त्यांतर्गत असुन त्यांचे देखभाल दुरुस्ती करीता रस्ता अनेक वेळा खोदण्यात येऊन नंतर त्यांचे डांबरी पॅचवर्क करण्यात आले आहे व अशाच स्थितीत सध्या रस्त्यावर वाहतुक सुरु आहे.

सदर रस्त्यावरील मंजुर विकास योजना आराखड्यानुसार बाधीत मिळकती बहुतांश ठिकाणी निष्काषीत करण्यात आलेल्या आहेत त्यामुळे रस्ता रस्ता विकास योजना (४० मीटर रुंद) नुसार पुर्णत: विकसीत करणे आवश्यक आहे.

१३व्या वित्त आयोगाच्या शिफारशी प्रमाणे महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या सुवर्ण जयंती निमित्त घ्यावयाचे उपक्रमांतर्गत सुवर्ण जयंती पथ म्हणुन एक प्रमुख रस्ता विकसीत करण्याचा समावेश असुन या अंतर्गत क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन हा रस्ता पुर्णपणे विकसीत करण्याचा प्रस्ताव आहे. त्यानुसार कॉंक्रीट पेव्हमेंट/ डांबरीकरण/युटीलीटी कॉरीडोर/फुटपाथ/साईड ड्रेन इत्यादी बाबींनुसार रस्ता सहा पदरी विकसीत करावयाचा असुन त्याअंतर्गत सध्या क्रांतीचौक ते कोकणवाडी (१२०० मीटर लांब) या रस्त्याचे विकास कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये १४,९२,७७,५००/- चे तयार करण्यात आले आहे.

१३ व्या वित्त आयोगांतर्गत यासाठी रक्कम रुपये ६.३२ कोटी इतकी उपलब्ध असुन उर्वरीत रक्कम रुपये ८.६० कोटींचा निधी याच शिर्षका प्राप्त होणा-या निधीतुन करण्यात येईल.

यापुढील रस्ता कोकणवाडी चौक ते रेल्वेस्टेशन (१३०० मीटर लांब) या भागाचा विकास उपरोक्त नुसार ४० मीटर रुंद विकास योजने प्रमाणे आवश्यक आहे. सध्या औरंगाबाद शहरातील विविध विकास योजना रस्ते विकसीत करणेच्या कामाकरीता डिफर्ड पेव्हमेंट धर्तीवर सन २०११-१२ अंतर्गत निविदा मंजुर असुन यामध्ये या रस्त्याच्या विकासा करीता वाढीव रक्कमेसह सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन स्वतंत्र मंजुरी प्राप्त केली जाईल.

याप्रमाणे रेल्वेस्टेशन ते क्रांतीचौक हा २५०० मीटर लांबीचा रस्ता सुवर्ण जयंती पथ म्हणुन विकसीत होणार आहे.

सदरील काम हे १३ व्या वित्त आयोगाच्या निधीअंतर्गत प्रस्तावीत असुन सदरील कामामध्ये कॉंक्रीट पेव्हमेंट बांधणेचा प्रस्ताव असल्याने त्यासाठी निविदापुर्व व निविदा नंतरची कामे दर्जेदार व गुणवत्ता राखुन करण्यासाठी पी.एम.सी ची नियुक्ती करणे आवश्यक आहे. करीता यासाठी पी.एम.सी.ची नियुक्ती निविदा काढुन करण्यात येईल.

१३ व्या वित्त आयोगा अंतर्गत यासाठी रक्कम रुपये ६.३२ कोटी इतका निधी उपलबध असुन उर्वरीत रक्कम रुपये ८.६० कोटीचा निधी याच शिर्षका अंतर्गत प्राप्त निधीतुन करण्यात येईल यास तसेच तयार करण्यात आलेले कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये १४,९२,७७,५००/- मंजुरीस्तव व या कामास पी.एम.सी. नियुक्त करणे करीता निविदा मागविणेचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**<u>संवाद:</u>**

श्री.प्रमोद राठोड :१३ व्या वित्त आयोगामधून खर्च करणार आहे ते कसे खर्च करणार शासनाचा जीआर काय आहे मार्गदर्शक तत्वे काय आहेत खुलासा करावा.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.काशिनाथ कोकाटे :या विषयावर चर्चा व्हावी.

या वेळीही अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत होते.

**मा.महापौर :आजच्या सभेत विषय पत्रिका ऐनवेळचे प्रस्ताव सर्वच विषय मंजूर**

**<u>ठराव:</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रेल्वे स्टेशन ते क्रांतीचौक हा रस्ता शहरातील मुख्य रस्ता असुन १३व्या वित्त आयोगाच्या शिफारशी प्रमाणे महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या सुवर्ण जयंती निमित्त घ्यावयाचे उपक्रमांतर्गत सुवर्ण जयंती पथ म्हणुन क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन हा रस्ता पुर्णपणे विकसीत करण्याचा असुन त्यानुसार कॉंक्रीट पेव्हमेंट/डांबरीकरण/युटीलीटी कॉरीडोर /फुटपाथ/साईड ड्रेन इत्यादी बाबींनुसार रस्ता सहा पदरी विकसीत करावयाचा असुन त्याअंतर्गत सध्या क्रांतीचौक ते कोकणवाडी

(१२०० मीटर लांब) या रस्त्याचे विकास कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये १४,९२,७७,५००/- चे तयार करण्यात आले असुन १३ व्या वित्त आयोगांतर्गत यासाठी रक्कम रुपये ६.३२ कोटी इतकी उपलब्ध असुन उर्वरीत रक्कम रुपये ८.६० कोटींचा निधी याच शिर्षकातुन प्राप्त करण्यास तसेच तयार करण्यात आलेले कामाचे रक्कम रूपये १४,९२,७७,५००/-च्या अंदाजपत्रकास तसेच कामे दर्जेदार व गुणवत्ता राखुन करण्यासाठी पी.एम.सी. नियुक्त करणे करीता नियमाप्रमाणे निविदा मागवुन नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८३२:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिध्दार्थ उद्यानासमोर मुख्य रस्ता ओलांडणेसाठी पादचा-यांना होणारा त्रास आणि वाहतुकीस निर्माण होणारे अडथळे दुर करणेसाठी उद्यानासमोरील रस्त्यावर फुट ओव्हर ब्रीज बांधणेसाठी कामासाठी मा.सर्वसाधारण सभा दिनांक २१.१२.२००९ रोजी ठराव क्रमांक ८५० अन्वये रक्कम रुपये ३०,००,०००/- च्या अंदाजपत्रकांस मान्यता प्राप्त झाली असुन सदर कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता श्री मुबारक महेबुब पठाण यांची १५% जास्त दराच्या निविदेस मा.स्थायी समिती सभा दिनांक २६.०२.२०१० विषय / ठराव क्रमांक ६६४ अन्वये मंजुरी प्राप्त झाल्यानुसार कामाचे कार्यादेश देऊन काम करण्यांत येत आहे.

सदर कामासाठी सन २००८ साली रक्कम रुपये ४०.०००००/- ची लेखी मागणी विभागाकडुन करण्यात आली होती परंतु या कामासाठी मागासक्षेत्र अनुदान निधी (BRGF) अंतर्गत फक्त रक्कम रुपये ३० लक्ष निधी प्राप्त झाल्यामुळे प्राप्त निधीनुसार रक्कम रुपये ३० लक्ष निधी प्राप्त झालेला आहे. त्यामुळे प्राप्त निधीनुसार रक्कम रुपये ३० लक्ष मर्यादीत अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. प्रत्यक्ष ठिकाणच्या डिझाईन नुसार आणि परिस्थितीनुरुप झालेल्या बदलानुसार करावयाच्या उर्वरीत कामांसाठी आवश्यक रक्कम आणि निविदा १५% जास्त दराची असल्यामुळे होणारी वाढीव रक्कम अशी एकुण रक्कम रुपये २०,००,०००/- च्या अतिरीक्त निधीची आवश्यकता असल्यामुळे सदरील काम करण्यास मा.आयुक्त महोदय यांनी दिनांक ०३.०४.२०१२ नुसार सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी प्राप्त आहे. प्रस्तावित ठिकाणचे फुट ओव्हर ब्रीजचे काम पुर्ण करु घेणेसाठी अतिरीक्त बाबींसह सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रुपये ५०,००,०००/- मान्यतेस्तव आणि वाढीव बाबींची परिमाणे मंजुर निविदा दराप्रमाणे तसेच अतिरीक्त बाबी चालु दरसुचीनुसार संबंधीत कामाचे मुळ कंत्राटदार यांचेकडुन करुन घेणेचा सुधारीत अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार सिध्दार्थ उद्यानासमोर मुख्य रस्ता ओलांडणेसाठी उद्यानासमोरील रस्त्यावर फुट ओव्हर ब्रीज बांधणेसाठी रक्कम रुपये ३०,००,०००/- च्या अंदाजपत्रकांस मान्यता प्राप्त झाली असुन सदर कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता श्री मुबारक महेबुब पठाण यांची १५% जास्त दराच्या निविदेस मा.स्थायी समिती सभा दिनांक २६.०२.२०१० विषय / ठराव क्रमांक ६६४ अन्वये मंजुरी प्राप्त झाल्यानुसार कामाचे कार्यादेश देऊन काम करण्यांत येत असून प्रत्यक्ष ठिकाणच्या डिझाईन नुसार आणि परिस्थितीनुरुप झालेल्या बदलानुसार करावयाच्या उर्वरीत कामांसाठी आवश्यक रक्कम आणि निविदा १५% जास्त दराची असल्यामुळे होणारी वाढीव रक्कम अशी एकुण रक्कम रुपये २०,००,०००/- च्या अतिरीक्त निधीची आवश्यकता असल्यामुळे प्रस्तावित ठिकाणचे फुट ओव्हर ब्रीजचे काम पुर्ण करु घेणेसाठी अतिरीक्त बाबींसह सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रुपये ५०,००,०००/- मान्यतेस आणि वाढीव बाबींची परिमाणे मंजुर निविदा दराप्रमाणे तसेच अतिरीक्त बाबी चालु दरसुचीनुसार संबंधीत कामाचे मुळ कंत्राटदार यांचेकडुन नियमाप्रमाणे करुन घेणेस व सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८३३:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महनगरपालिकेने सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक २३३/३ दिनांक २०/१/०४ व १९४/३ दिनांक १८/०२/२००६ नुसार सिडको अधिसूचित क्षेत्रातून वगळण्यात आलेल्या महानगरपालिका हद्दीतील क्षेत्रासाठी व नव्याने महानगरपालिका हद्दीत समाविष्ट

झालेल्या शिवाजीनगर सिडको क्षेत्रासाठी विकास योजना तयार करणे, व वाढीव हद्दीसाठी मंजुर झालेली विकास योजना सुधारित करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ (१) सह कलम ३८ अन्वये इरादा जाहीर केलेला आहे. त्याचप्रमाणे विषय क्रमांक ३१७, दिनांक १८/०५/२०११ अन्वये उक्त मंजुर ठरावामधील आवश्यक दुरुस्तीनुसार सुधारित ठराव पारीत केलेला आहे.

त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन, निर्णय क्रमांक टिपीव्ही-२३१०/७८०/प्र.क्र.२२४/नवि-२७, दिनांक १३ जानेवारी, २०११ नूसार शासनातर्फे उप संचालक नगर रचना यांच्या अधिपत्याखाली उप संचालक नगर रचना, विकास योजना विशेष घटक, औरंगाबाद महानगरपालिका या कार्यालयाची स्थापना करण्यात आली. त्याच्या अधिपत्याखाली नगररचनाकार, सहाय्यक नगररचनाकार, रचना सहाय्यक, कनिष्ठ आरेक्षक, अनुरेक्षक, आदि १५ पंदाची पदस्थापना करण्यात आली. मात्र त्यावर नियमित अधिकाऱ्यांची नेमणुक न झाल्याने सुधारीत विकास योजनेच्या कामात पाहिजे त्या गतीने काम होवू शकले नाही.

विकास योजना तयार करण्याच्या कामात विद्यमान जमिन वापर सर्व्हेक्षण करुन विद्यमान जमिन वापराचा नकाशा तयार करणे हा महत्वाचा टप्पा आहे. या कामासाठी (०१) संपूर्ण क्षेत्राचे सर्वेक्षण करणे (०२ ) उपग्रहीय चित्र मिळविणे (०३) डि.जी.पी.एस. सर्वेक्षण (०४) उपग्रहीय चित्राचे आरेखन करणे (०५) रस्त्यांचे टोटल स्टेशन सर्वेक्षण करणे (०६) वाढीव हद्दीतील महत्वाच्या मालमत्ता (इमारतीचे/ जागेचे) जोते मोजणी (०७) टोटल सर्वेक्षण व उपग्रहीत चित्राच्या आधारे केलेले आरेखन एकत्रीत करणे (०८) आधारभुत नकाशाची जागेवर पडताळणी (०९) नगर भुमापनाच्या आराखडयाचे संगणीकृत आराखडयात बसविणे (१०) गावनकाशे संगणीकृत करणे व टोटल स्टेशन सर्वेक्षणाचा संगणीकृत आराखडा एकत्रीत करणे (११) मंजुर सर्वे (ले-आऊट) नकाशाचे संगणीकरण करुन वाढीव भागात समाविष्ट गावांचा आराखडा अदयावत करणे (१२) इमारतीचे सर्वेक्षण करुन जमीन वापर फार्म कलेक्शन करणे (१३) संगणीकृत विद्यमान जमीन वापराचा आराखडा तयार करणे (१४) संकलित महितीच्या आधारे टप्पानिहाय कलम २५ नुसार विद्यमान जमीन वापर तपशिल तयार करणे इत्यादी कामांचा समावेश आहे.

प्रस्तावित सुधारीत विकास योजने खालील क्षेत्र सुमारे १०,००० हेक्टर एवढे असून एवढया मोठया क्षेत्रासाठी वर उल्लेख केल्याप्रमाणे सविस्तर सर्वेक्षण पुरेश्या सुक्ष्मपणे व अचुकपणे करण्यासाठी मोठयाप्रमाणावर अत्यआधुनिक सर्वेक्षण साहित्याचा वापर करणे तसेच आधुनिक तंत्राद्वारे उपग्रहीय नकाशे उपलब्ध करुन घेणे यासाठी उपलब्ध मनुष्यबळ संख्यात्मक दृष्टया पुरेशे
नसल्याने तसेच प्रत्यक्ष फिल्डसर्वेक्षणाचा आधुनिक यंत्राद्वारे त्यांना पुरेसा अनुभव नसल्याने अस्तित्वातील जमिन वापर सर्वेक्षण व नकाशे खाजगी संस्थेकडुन किंवा सर्वेक्षण एजन्सीकडुन करुन घेणे आवश्यक आहे. उपलब्ध कार्यालयीन कर्मचाऱ्यांकडुन लागणारा संभाव्य वेळ व त्यानुषंगाने वेतनावरील अपेक्षित खर्च बघता आर्थिक दृष्टयाही खाजगीकरणातुन हे काम करुन घेणे फायदेशीर आहे.

त्यामुळे सदर कामासाठी तंज्ञ व अशा कामाचा अनुभव असणारे संस्थांकडुन स्वारस्य प्रस्ताव (EOI) मागविण्यात आले होते. त्यात सदरील कामाचा पुरेसा अनुभव असणे, संस्थेची वार्षिक उलाढाल अपेक्षित अंदाजपत्रकाच्या तुलनेत पुरेशी असणे व संस्थेची आर्थिक कुवत, उपलब्ध मनुष्यबळ आदी मानके ठेवली होती. या प्रस्तावास प्रतिसाद म्हणुन,

०१. बी.एम.घाटगे इंजिनिअर ॲण्ड कॉन्ट्रेक्टर, पुणे
०२. इन्फॉस्ट्रक्चर डेव्हलपमेंट ॲण्ड कन्सल्टंट इंडिया प्रा.लि., नवि मुंबई
०३. सेव्हा कन्स्लटंट्स कन्सलटींग इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स, नांदेड
०४. झेनोलीथ जिओ सर्व्हेसेस, पुणे
०५. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था

या संस्थानी त्यांचे प्रस्ताव सादर केले. यापैकी अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडेच फक्त कामाचा अनुभव व पुरेशी आर्थिक उलाढाल आदी सर्व निकष पूर्ण करण्याची क्षमता

होती. त्यामुळे या संस्थेकडुन त्यांचा आर्थिक प्रस्ताव मागविण्यात आला. त्यानुसार त्यांनी पूढील प्रमाणे प्रस्ताव दिला आहे.

**अंदाजीत खर्चः-**

औरंगाबाद वाढीवहद्दीचे क्षेत्रफळ एकूण ९५०० हेक्टर आहे व त्यापैकी २० टक्के गावठाण (दाट लोकवस्तीचे क्षेत्र), २० टक्के मध्यम लोकवस्तीचे क्षेत्र व ६० टक्के विरळ लोकवस्तीचे क्षेत्र असल्याचे गृहीत धरुन खालील दर (सर्व करांसह) नमुद केलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| गावठाण/घनदाट (दाट लोकवस्तीचे क्षेत्र) | - | रु. २९७५/हेक्टर |
| मध्यम घनदाट(मध्यम लोकवस्तीचे क्षेत्र) | - | रु. १४८५/हेक्टर |
| विरळ(विरळ लोकवस्तीचे क्षेत्र) | - | रु. २५०/हेक्टर |

वरील दराने १०,००० हेक्टर साठी एकुण खर्च रु. ९५ लक्ष एवढा अपेक्षित आहे.

तरी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्राचे सन १९९१ ची विकास योजना सुधारीत करणे, सिडको डिनोटीफाईड एरियासाठी विकास योजना तयार करण्याचे कामा अंतर्गत अस्तित्वातील जमिन वापर सर्वेक्षण व अस्तित्वातील जमिन वापर नकाशे तयार करणे हे काम खाजगी संस्थेकडून करुन घेण्यास धोरणात्मक मान्यता होणे, त्यासाठी सुमारे ९५ लक्ष रुपये रक्कमेची तरतुद होणे व अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडुन वरील दराप्रमाणे काम करुन घेण्यास प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवादः**

महापौर :- मंजूर

**ठरावः**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको अधिसूचित क्षेत्रातून वगळण्यात आलेल्या महानगरपालिका हद्दीतील क्षेत्रासाठी व नव्याने महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या शिवाजीनगर सिडको क्षेत्रासाठी विकास योजना तयार करणे, व वाढीव हद्दीसाठी मंजुर झालेली विकास योजना सुधारित करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ (१) सह कलम ३८ अन्वये इरादा जाहीर केल्यानुसार तसेच विकास योजना तयार करण्याच्या कामात विद्यमान जमिन वापर सर्व्हेक्षण करुन विद्यमान जमिन वापराचा नकाशा तयार करणे हा महत्वाचा टप्पा असुन या कामासाठी प्रस्तावात नमुद केल्यानुसार अनुक्रमांक १ ते १४ नुसार कामाचा समावेश असुन औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्राचे सन १९९१ ची विकास योजना सुधारीत करणे, सिडको डिनोटीफाईड एरियासाठी विकास योजना तयार करण्याचे कामा अंतर्गत अस्तित्वातील जमिन वापर सर्वेक्षण व अस्तित्वातील जमिन वापर नकाशे तयार करणे हे काम खाजगी संस्थेकडून करुन घेण्यास धोरणात्मक मान्यता होणेस त्यासाठी सुमारे ९५ लक्ष रुपये रक्कमेची तरतुद होणेस व अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडुन प्रस्तावात नमुद दराप्रमाणे अडीच महिन्याच्या कालावधीत नियमाप्रमाणे काम करुन घेण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८३४:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्प पुस्तिकेत पान क्रमांक GBR-Ward-C-Page ०४ अ.क्र.-१ वर-वार्ड क्रमांक २९ अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे रक्कम रुपये १० लक्ष आहे. या कामाऐवजी

वार्ड क्रमांक २९ अंतर्गत विविध ठिकाणी संरक्षित भिंत बांधणे रक्कम रुपये १० लक्ष. तरी सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

सुचक :- श्रीमती जरीना म.जावेद अनुमोदक :- डॉ.खान जफर अहेमद

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २०११-१२ च्या अर्थसंकल्प पुस्तिकेत पान क्रमांक GBR-Ward-C-Page ०४ अ.क्र.-१ वर-वार्ड क्रमांक २९ अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे रक्कम रुपये १० लक्ष या कामाऐवजी वार्ड क्रमांक २९ अंतर्गत विविध ठिकाणी संरक्षित भिंत बांधणे रक्कम रुपये १० लक्ष रुपयास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ८३५:</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिका हद्दीत बिडबायपास रोडवरील एमआयटी कॉलेज जवळील चौकास पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर चौक व मार्ग असे नांव देण्यासाठी नागरीकांची वारंवार मागणी होत आहे. नागरीकांची मागणी लक्षात घेता एमआयटी कॉलेज जवळील चौकास पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर चौक व मार्ग असे नामकरण करण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक :- १)श्री.विजय वाघचौरे
२) श्री.रेणुकादास (राजु) वैद्य

अनुमोदक :- १) श्री.सुर्यकांत जायभाये
२) श्रीमती साधना सुरडकर

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार बिडबायपास रोडवरील एमआयटी कॉलेज जवळील चौकास पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर चौक व मार्ग असे नामकरण करण्यास मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ८३६:</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.३३ गुलमंडी अंतर्गत फकीरवाडी भागात भाड्याने राहणा-या तसेच वडापाव विकुन कुटुंबाची देखभाल करणा-या श्री.जगदीश विसपुते यांच्या घरात पावसाचे व नाल्याचे पाणी शिरुन घरातील सर्वांचे कपडे अन्नधान्य तसेच गृहोपयोगी वस्तु पाण्यात वाहुन गेल्यामुळे या कुटुंबांचे पुर्ण नुकसान झाले असुन संपुर्ण कुटुंब उघडण्यावर आले आहे.

पावसाच्या व नाल्याच्या पाण्यामुळे झालेले या कुटुंबांची वाताहात भरुन येण्यासाठी नाही. तरी सुध्दा या कुटुंबास पुढील आयुष्यासाठी आर्थिक मदत म्हणुन महानगरपालिकेमार्फत रु. ०१ लक्ष (एक लक्ष रुपये फक्त) आर्थिक मदत देण्यात यावी.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक :- श्रीमती प्रिती संतोष तोतला

अनुमोदक :- श्री.विजय वाघचौरे

**<u>ठराव:</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.३३ गुलमंडी अंतर्गत फकीरवाडी येथील श्री.जगदीश विसपुते यांचे घरात पावसाचे व नाल्याचे पाणी शिरल्यामुळे नुकसान झाले असल्याने त्यांच्या कुटुंबास महानगरपालिकेमार्फत रु. ०१ लक्ष (एक लक्ष रुपये फक्त) रूपये आर्थिक मदत नियमानुसार देण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ८३७:</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मिटमिटा येथील मनपा शाळा इयत्ता १ली ते १०वी पर्यंत आहे. मुलांची संख्या जास्ती असल्याने मुलांसाठी अपुरी पडत आहे. मुलांना या शाळेत खेळाचे मैदान नाही. शाळेला संरक्षित भिंत नसल्यामुळे मुले रोडवर मध्यान्हसुट्टीत खेळत असतात. सदरील शाळा मुख्य रोडवर असल्याने येथे नेहमीच वाहनाची वर्दळ असते ज्यामुळे शिक्षकांना मुलांना शिकवतांना वाहनांच्या आवाजाचा (ध्वनीचा) त्रास सहन करावा लागतो. तसेच थोड्याच अंतरावर जकात नाका असुन वाहनांची गर्दी होत असते व अनेक वेळा या रोडवर अपघात झालेले आहेत. पालकांना आपल्या मुलांना शाळा सुटल्यानंतर रस्ता ओलांडतांना जिव मुठीत घ्यावे लागते. तथापी शाळेतील विद्यार्थ्यांसोबत भविष्यात काही अनुचित प्रकार घडु नये म्हणुन मिटमिटा येथील नागरीकांनी शाळा इतरत्र हालविण्याची वारंवार मागणी होत आहे.

करीता मिटमिटा गावालगत गट नं.३०७ मधील गायरान जमीनीतुन पाच एकर जमीन मनपा शाळेसाठी उपलब्ध करुन घेण्याबाबत संबंधीत विभागास सुचना देऊन पुढील कार्यवाहीसाठीचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक :- श्रीमती सावित्री हिरालाल वाणी

अनुमोदक :- श्री.विजय वाघचौरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मिटमिटा येथील मनपा शाळा इयत्ता १ली ते १०वी पर्यंत असुन मुलांची संख्या जास्ती असल्याने मुलांसाठी अपुरी पडत असल्याने मिटमिटा गावालगत गट नं.३०७ मधील गायरान जमीनीतुन पाच एकर जमीन मनपा शाळेसाठी उपलब्ध करुन घेण्याबाबत संबंधीत विभागास सुचना देऊन पुढील कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८३८:**

प्रस्ताव सादर करते की, पडेगाव, मिटमिटात मोठ्या प्रमाणात नविन वसाहती निर्माण झालेल्या या भागाचे क्षेत्र मोठे व्यापलेले असुन लोक संख्यात ही वाढ झालेली असुन नागरीकांनी या भागात जॉगींग ट्रक तयार करण्यासाठी वारंवार मागणी केलेली आहे.

करीता पडेगाव लगत गट नं. ६६ मधील सरकारी गायरान जमीनीतुन ०२ एकर जमीन जॉगींग ट्रकसाठी उपलब्ध करुन घेण्याबाबत संबंधीत विभागास सुचना देऊन पुढील कार्यवाहीसाठीचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक :- श्रीमती सावित्री हिरालाल वाणी    अनुमोदक :- श्री.विजय वाघचौरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पडेगाव, मिटमिटा लगत गट नं. ६६ मधील सरकारी गायरान जमीनीतुन ०२ एकर जमीन जॉगींग ट्रकसाठी उपलब्ध करुन देण्यासाठी संबंधीत विभागास सुचना देऊन पुढील कार्यवाहीच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८३९:**

प्रस्ताव सादर करते की, पडेगावातील जुनी स्मशान भुमी मुंबई महामार्गावर असुन नागरीकांना अंतयात्रा जीव मुठीत घेऊन जावे लागते तसेच स्मशानभुमीचे क्षेत्र अत्यंत कमी व नाल्याकाठी आहे. पावसाळ्यात सदरील नाला वाहत असल्याने नागरीकांना स्मशानभुमीत जाण्यास फार अडचण निर्माण होते. पडेगांवात मोठ्या प्रमाणात नविन वसाहती निर्माण झालेल्या या भागाचे क्षेत्र मोठे व्यापलेले असुन लोकसंख्यात ही वाढ झालेली आहे.

करीता पडेगाव लगत गट नं.६९ मधील सरकारी गायरान जमीनीतुन ०२ एकर जमीन स्मशानभुमीसाठी उपलब्ध करुन घेण्याबाबत संबंधीत विभागास सुचना देऊन पुढील कार्यवाहीसाठीचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक :- श्रीमती सावित्री हिरालाल वाणी    अनुमोदक :- श्री.विजय वाघचौरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पडेगाव लगत गट नं.६९ मधील सरकारी गायरान जमीनीतुन ०२ एकर जमीन स्मशानभुमीसाठी उपलब्ध करुन घेण्याबाबत संबंधीत विभागास सुचना देऊन पुढील कार्यवाहीसाठीच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८४०:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की औरंगाबाद ॲम्युचर ॲक्वेटीक असोसिएशनच्या वतीने जलतरण या खेळाचा प्रचार व प्रसार होण्यासाठी खुल्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धा या आर्थीक वर्ष २०१२-१३ मध्ये आयोजित करण्यात येणार आहे तसेच स्पर्धेस महानगरपालिकेतर्फे रक्कम रूपये ३.०० लक्ष आर्थीक मदत म्हणुन औरंगाबाद ॲम्युचर ॲक्वेटीक असोसिएशन यांच्या नावे देण्यात यावे करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर

सुचक :श्री.किशार नागरे, श्री.विरभद्र गादगे    अनुमोदक :श्रीमती प्राजक्ता राजपुत
श्री.हुशारसिंग चव्हाण

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद ॲम्युचर ॲक्वेटीक असोसिएशनच्या वतीने खुल्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धा या आर्थीक वर्ष २०१२-१३ मध्ये आयोजित करण्यात येणार असुन स्पर्धेस महानगरपालिकेतर्फे रक्कम रूपये ३.०० लक्ष आर्थीक मदत देण्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यास

व औरंगाबाद ॲम्युचर ॲक्वेटीक असोसिएशन यांच्या नावे देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ८४१:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की स्विडन आणि डेनमार्क येथे होणा-या अंतरराष्ट्रीय १९ वर्षाखालील युवा चषक फुटबाल स्पर्धा २०१२ साठी औरंगाबाद शहरातील युवा खेडाळु श्री. सिद्यीकी आकिब जावेद यांची निवड झालेली असुन त्यास स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आर्थिक मदतीची गरज आहे या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आर्थिक मदतीची गरज आहे या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी त्याला रक्कम रूपये ९५,०००/- (पंच्याणनऊ हजार रूपये )इतका खर्च होणार आहे.

औरंगाबाद शहरातील खेडाळु अंतराष्ट्रीय स्पर्धेत देशाचे प्रतिनिधीत्व करतो ही शहरवासियासाठी अभिमानाची बाब आहे श्री.सिद्यीकी आकिब जावेद यास औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे यापुर्वी अनेक खेडाळुना ज्या प्रकारे आर्थीक मदत केलेली त्या प्रमाणेच रक्कम रूपये ५०,०००/-(पन्नास हजार रूपये) आर्थीक मदत करण्यांत यावी. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक :डॉ.खान जफर अहेमद		अनुमोदक: श्री.प्रशांत देसरडा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार स्विडन आणि डेनमार्क येथे होणा-या अंतरराष्ट्रीय १९ वर्षाखालील युवा चषक फुटबाल स्पर्धा २०१२ साठी औरंगाबाद शहरातील युवा खेडाळु श्री. सिद्यीकी आकिब जावेद यांची निवड झालेली असुन त्यास स्पर्धेत सहभागी होण्यासाठी श्री.सिद्यीकी आकिब जावेद यास महानगरपालिकेतर्फे रक्कम रूपये ५०,०००/-(पन्नास हजार रूपये) आर्थीक मदत देणे बाबत नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक.८४२:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की औरंगाबाद महानगरपालिका गुंठेवारी क्षेत्रातील प्रभाग क्र. ८७ उल्कानगरी मधील हनुमानगर, गारखेडा, जवारहनगर पोलीस स्टेशन मागील वसाहत गुंठेवारी क्षेत्रात येत असुन येथील वसाहतीमध्ये महानगरपालिकेने मुलभुत सोई देखील पुरविल्या आहेत परंतू या वसाहतीमधील काही भाग महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखडयामध्ये आरक्षण क्र. २३५ सांस्कृतिक सभागृह या आरक्षणाने बांधीत आहे परंतु या जागेवर १०० टक्के घरे बांधून झालेली असल्याने महानगरपालिकेस आरक्षणा करीता जागा उपलब्ध होणार नाही त्यामूळे सदर आरक्षण रद्य करून गुंठेवारी विकासामध्ये समाविष्ठ करणे आवश्यक आहे महानगरपालिकेने यापुर्वी अशाप्रकारची आरक्षणे रद्य केली आहेत

करिता आरक्षण क्रमांक २३५ सांस्कृतिक सभागृह सर्व्हे नं १, सि स नं १५३०४/पैकी मधील आरक्षण रद्य करून गुंठेवारी विकासात हा भाग समाविष्ठ करावा व गुंठेवारी विकास अधिनियमानुसार येथील वसाहतीमधील मिळकती नियमाधीन कराव्यात करीता प्रस्ताव सर्व साधारण सभेपूढे मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.संजय जोशी		अनुमोदक: श्री.महेश माळवतकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गुंठेवारी क्षेत्रातील प्रभाग क्र. ८७ उल्कानगरी मधील हनुमानगर, गारखेडा, जवारहनगर पोलीस स्टेशन मागील वसाहतीमधील काही भाग महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखडयामध्ये आरक्षण क्र. २३५ सांस्कृतिक सभागृह या आरक्षणाने बांधीत असुन तेथे १०० टक्के घरे बांधून झालेली असल्याने महानगरपालिकेस आरक्षणा करीता जागा उपलब्ध होणार नसल्याने आरक्षण क्रमांक २३५ सांस्कृतिक सभागृह सर्व्हे नं १, सि स नं १५३०४/पैकी मधील आरक्षण रद्य करून गुंठेवारी विकासात हा भाग समाविष्ठ करावा व गुंठेवारी विकास अधिनियमानुसार येथील वसाहतीमधील मिळकती नियमानुसार नियमाधीन करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक.८४३:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की वार्ड क्र. ४८ अविष्कार कॉलनी येथील खुल्या जागेत मागील १५ वर्षापुर्वी २०X१५ चे खुले व्यासपीठ पत्र्याचे शेडमध्ये उभारण्यात आले होते या शेड मध्ये प्रत्येकी वर्षी गणेश उत्सव, नवरात्र उत्सव मोठया प्रमाणावर साजरा केला जातो तसेच या प्रभागातील नागरीक विविध धार्मिक सामाजीक कार्यक्रमासाठी वापरात आणतात.

करिता सद्यस्थितीत सदरील व्यासपीठाची अत्यंत दुरावस्था झालेले असून पुर्ण मोडकळीस आले व नागरीकांनी नविन शेड उभारण्यासाठी मागणी केलेली असून या ठिकाणी नविन ३०X२० आकाराचे आर.सी.सी शेडउभारण्यासाठीचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर

सुचक :श्री.विरभद्र गादगे, अनुमोदक :श्रीमती सविता सुरे, श्री.किशोर नागरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ४८ अविष्कार कॉलनी येथील खुल्या जागेत मागील १५ वर्षापुर्वी २०X१५ चे खुले व्यासपीठ पत्र्याचे शेडमध्ये उभारण्यात आले असुन सद्यस्थितीत सदरील व्यासपीठाची अत्यंत दुरावस्था झालेले असून पुर्ण मोडकळीस आल्याने या ठिकाणी नविन ३०X२० आकाराचे आर.सी.सी शेड उभारण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८४४:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की वार्ड क्र. ४ एकतानगर मध्ये दलीत वस्ती असुन अनेक वर्षापासुन या भागात नागरीकांना सुविधा उपलब्ध नाही ज्यामुळे या भागातील नागरीकांची गैरसोय होत आहे तथापी या भागातील नागरीकांनी अंतर्गत नविन रस्ते तयार करणे व या भागाला जोडणारे मुख्य रस्ते डांबरीकरण करून देणे बाबत वारंवार मागणी केलेली आहे.

करीता दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत एकतानगर मध्ये खालील विकास कामाची तरतुद ठेवण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

१. वार्ड क्र. ४ एकतानगर विविध भागातील रस्ते डांबरीकरण करणे -१५ लक्ष
२. वार्ड क्र. ४ एकतानगर विविध भागातील रस्त्याचे कॉक्रीट करणे -१५ लक्ष

सुचक :श्रीमती ज्योती रूपचंद वाघमारे अनुमोदक : श्री.शेख हबीब कुरैशी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४ एकतानगर मध्ये दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत एकतानगर मध्ये खालील विकास कामासाठी तरतुद ठेवण्यास मंजुरी देण्यात येते.

१. वार्ड क्र. ४ एकतानगर विविध भागातील रस्ते डांबरीकरण करणे -१५ लक्ष
२. वार्ड क्र. ४ एकतानगर विविध भागातील रस्त्याचे कॉक्रीट करणे -१५ लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८४५:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की वार्ड क्र. २७ शताब्दीनगर अंतर्गत गरीब व दलित समाजातील लोकांची वसाहत आहे त्यांना खाजगी मंगल कार्यालयाचे भाडे परवडत नाही त्यांच्या कडील मंगल कार्यासाठी त्यांना किफायतशीर भाडे असणा-या मंगल कार्यालयाची आवश्यकता आहे करिता शताब्दीनगर प्रभागा अंतर्गत महापालिकेमार्फत मंगल कार्यालय बांधण्यात यावे व या मंगल कार्यालयास बौध्दवासी शंकुतलाबाई इंगळे यांचे नाव देण्यात यावे तसेच या मंगल कार्यालयासाठी आगामी अर्थसंकल्पात रू.५० लाखाची तरतूद ठेवण्यात यावी करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर

सुचक : श्री. सुरेश इंगळे अनुमोदक :श्री.अनिल जैस्वाल, श्री.रामदास बोराडे

मा.महापौर :मंजूर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. २७ शताब्दीनगर अंतर्गत गरीब व दलित समाजातील लोकांची वसाहत असून तेथे किफायतशीर भाडे असणा-या मंगल कार्यालयाची आवश्यकता असल्याने

शताब्दीनगर प्रभागात महापालिकेमार्फत मंगल कार्यालय बांधण्यास व या मंगल कार्यालयास बौध्दवासी शंकुतलाबाई इंगळे यांचे नाव देण्यास तसेच या मंगल कार्यालयासाठी आगामी अर्थसंकल्पात रू.५० लाखाची तरतूद नियमाप्रमाणे ठेवण्यात मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८४६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की वार्ड क्र. २मयुर पार्क जाधववाडी येथील सर्व्हे १५६,१८८, १८०,१९१,१९०, १५८,१८२,१९२,१२७,१५४,१५१,१९०,१५२, या स.नं. गुंठेवारी अंतर्गत नागरीकांनी मनपा फंडात रक्कमेचा भरणा करून आपले घरे नियमित केलेली आहे उक्त स.नं. मधील एकुण रक्कम रू १३ लक्ष गुंठेवारी शुल्क म्हणुन जमा झालेली आहे तसेच स.नं१५६ या वसाहतीमध्ये कोणतीही नागरीक मुलभुत सुविधा उपलब्ध नसल्यामुळे नागरीकांची फार गैरसोय होत आहे.

करीता गुंठेवारी शुल्कापोटी जमा झालेली एकुण रक्कम रू.१३ लक्ष स.नं.१५६ या वसाहतीमध्ये कॉक्रटींग रस्ते तयार करणे व ड्रेनेज लाईन टाकणे या कामासाठी वळती करण्यांत यावे तरी प्रस्ताव सर्वानुमते मंजुरीस्तव सादर.

सुचक श्रीमती सविता सुरे अनुमोदकः श्री.बन्सी ग्यानु जाधव,श्रीमती सावित्री हिरालाल वाणी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. २ मयुर पार्क जाधववाडी येथील सर्व्हे १५६, १८८, १८०, १९१,१९०,१५८,१८२,१९२,१२७,१५४,१५१,१९०,१५२,या गुंठेवारी अंतर्गत शुल्कापोटी जमा झालेली एकुण रक्कम रू.१३ लक्ष स.नं.१५६ या वसाहतीमध्ये कॉक्रटींग रस्ते तयार करणे व ड्रेनेज लाईन टाकणे या कामासाठी नियमानुसार वळती करण्यांस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८४७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की वार्ड क्र.१ हर्सुल जुनी स्मशानभुमी हर्सुल पासुन २ कि.मी. अंतरावर आहे नागरीकांना अंतयात्रा घेवुन जाण्यासाठी फार अडचण निर्माण होते तसेच स्मशानभुमीचे क्षेत्र अत्यंत कमी आहे हर्सुल गांवात मोठया प्रमाणात नविन वसाहती निर्माण झाल्या आहे या भागाचे क्षेत्र मोठे व्यापलेले असुन लोक संख्यात ही वाढ झालेली आहे.

करीता हर्सुल स.नं. २२४ मधील मनपाच्या खुल्या जागेतुन जमिन स्मशानभुमी साठी आरक्षीत करण्यात येवुन सदरची स्मशानभुमी विकासीत करण्यासाठी संबधीत विभागास सुचना देवुन पुढील कार्यवाहीसाठीचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक श्री. बन्सी ग्यानु जाधव अनुमोदक :श्री.राजगौरव वानखेडे, श्री.त्रिंबक तुपे

**संवादः-**

मा.महापौरः-मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार वार्ड क्र.१ हर्सुल स.नं.२२४ मधील मनपाच्या खुल्या जागेतुन जमिन स्मशानभुमी साठी आरक्षीत करणे व सदर स्मशानभुमी विकसीत करण्यासाठी संबधीत विभागास सुचना देवुन नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८४८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्यीत सिडको हस्तांतरण करते वेळेस चिस्तिया कॉलनी ही वसाहत अस्तित्वात होती सदरील वसाहत अंदाजे ३० ते ३५ वर्ष जुनी आहे या ठिकाणी महानगरपालिकेतर्फे सर्व मुलभुत सुविधा हि पुरविण्यांत आलेली आहे तसेच या वसाहतीत महापालिकेचे कर सुध्दा लावण्यांत आलेले आहे.

सदरील वसाहतीत अंदाजे ६०० मालमत्ता धारक असुन बहुतांश सर्वांनी सन २००३ मध्ये गुंठेवारी कायदा लागु करण्यासाठी व गुंठेवारी शुल्क भरण्यासाठी संचिका दाखल केलेले आहेत परंतु आतापर्यंत कार्यवाही झालेली नाही जेणे करून महानगरपालिकेचे आर्थीक नुकसान होत आहे.करिता

सिडको येथील चिस्तीया कॉलनी येथील घराचे गुंठेवारी अधिनियमांतर्गत नियमाधीन करून घेण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक :डॉ.खान जफर अहेमद अनुमोदक:श्री.शेख अब्दूल असद, श्रीमती सत्यभामा दामोधर शिंदे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत सिडको भागातील चिस्तीया कॉलनी येथील घराचे गुंठेवारी अधिनियमांतर्गत नियमाधीन करून घेण्यासाठी नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८४९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की वार्ड ९१ उस्मानपुरा येथील जुनी उस्मानपुरा पोलीस चौकीमागे बांधण्यात आलेले महानगरपालिकेचे बहुउद्येशीय सभागृह हे फ्रेन्डस चॅरीटेबल वेल्फेअर औरंगाबाद या संस्थेस नाममात्र भाडे तत्वावर ३० वर्षासाठी महानगरपालिकेच्या अटी व शर्तीनुसार देण्याकरीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेमध्ये मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.खान अक्रम करीम खान अनुमोदक :श्री.समीर सुभाष राजूरकर,डॉ.खॉन जफर अहेमद

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार वार्ड ९१ उस्मानपुरा येथील जुनी उस्मानपुरा पोलीस चौकीमागे बांधण्यात आलेले महानगरपालिकेचे बहुउद्येशीय सभागृह हे फ्रेन्डस चॅरीटेबल वेल्फेअर औरंगाबाद या संस्थेस नाममात्र भाडे तत्वावर ३० वर्षासाठी महानगरपालिकेच्या अटी व शर्तीनुसार व नियमाप्रमाणे देण्यास मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८५०:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.२४ एमआयडीसीमध्ये श्री.संघानंद प्रियानंद शिंदे हे सर्पमित्र राहतात. या भागासह शहरातील विविध ठिकाणी साप पकडण्याचे कामे ते करतात. परंतु दुर्देवाने एमआयडीसी मधील बीडीए कंपनीमध्ये दिनांक ०७.०७.२०१२ रोजी साप (कोब्रा जातीचा नाग) पकडत असतांना त्यांच्या हातावर सापाने (कोब्रा जातीचा नाग) दंश केला त्यामुळे त्यांना तातडीने दवाखान्यात नेण्यात आले. त्यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी (शस्त्रक्रिया व सर्जरी करणेसाठी) मानवतेच्या दृष्टीकोन समोर ठेवून आर्थिक मदत उपलब्ध करून देणे आवश्यकता आहे. त्यांना औषधोपचारासाठी येणारा खर्च जास्त असल्याने महापालिकेतर्फे त्यांना रक्कम रूपये १.०० लक्ष आर्थिक मदत उपलब्ध करून देण्यांत यावे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक:-श्री.राजू शिंदे, अनुमोदक:-श्री.संजय चौधरी, श्री.रवि कावडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२४ एमआयडीसीमध्ये श्री.संघानंद प्रियानंद शिंदे हे सर्पमित्र असुन एमआयडीसी मधील बीडीए कंपनीमध्ये दिनांक ०७.०७.२०१२ रोजी साप (कोब्रा जातीचा नाग) पकडत असतांना त्यांच्या हातावर सापाने (कोब्रा जातीचा नाग) दंश केल्याने औषधोपचारासाठी येणारा खर्च जास्त असल्याने महापालिकेतर्फे त्यांना रक्कम रूपये १.०० लक्ष आर्थिक मदत नियमाप्रमाणे उपलब्ध करून देण्यांस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८५१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.८३ पुंडलिकनगर अंतर्गत न्यु.हनुमाननगर हा भाग दलित वसाहत असून या भागातील नागरीकांना मुलभूत सुविधा उदा.रस्ते,ड्रेनेज,पाणी, लाईट इ. विविध विकास कामासाठी रक्कम रूपये ५०.०० लक्ष आर्थिक तरतुद उपलब्ध करून देण्यांत यावी व पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यांत यावी. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक: श्री.सुर्यकांत जायभाये अनुमोदक:श्री.बबन नरवडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.८३ पुंडलिकनगर अंतर्गत न्यु.हनुमाननगर या दलित भागातील नागरीकांना मुलभूत सुविधा उदा.रस्ते,ड्रेनेज,पाणी, लाईट इ. विविध विकास कामासाठी रक्कम रूपये ५०.०० लक्ष आर्थिक तरतुद उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८५२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, पुंडलिकनगर गारखेडा परिसरात जय दुर्गा हौसींग सोसायटी ते तिरूमला मंगल कार्यालय ते जालना रोड पर्यंत २४ मीटर रूंद नियोजीत रस्ता रूंदिकरणाचे प्रशासनाचे नियोजन आहे. सदरील नियोजीत रस्तालगत गेल्या अनेक वर्षापासून रहिवासी वस्ती असून हा रस्ता पुर्णपणे वापरता येईल. अशी सद्या परिस्थिती नाही. तसेच या भागातील नागरीकांनी गुंठेवारी कायद्याअंतर्गत गुंठेवारीची रक्कमेचा भरणा मनपात केलेला आहे. तेव्हा या रस्त्याला पर्यायी रस्ता प्रशासनाने सुचवावा इतर सर्व बाबी तपासूनच व सर्व संबंधीत नागरीक यांना विश्वासात घेवुनच पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

सुचक: श्री.सुर्यकांत जायभाये अनुमोदक:श्री.रेणुकादास वैद्य,श्री.विजय वाघचौरे

**संवाद:-**

मा.महापौर :दुरूस्तीसह मंजूर

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पुंडलिकनगर गारखेडा परिसरात जय दुर्गा हौसींग सोसायटी ते तिरूमला मंगल कार्यालय ते जालना रोड पर्यंत २४ मीटर रूंद नियोजीत रस्ता रूंदिकरणाचे प्रशासनाचे नियोजन असुन नियोजीत रस्त्यालगत गेल्या अनेक वर्षापासून रहिवासी वस्ती असुन नागरीकांनी गुंठेवारी कायद्याअंतर्गत गुंठेवारी रक्कमेची भरणा केलेली असुन या रस्त्याला पर्यायी रस्ता प्रशासनाने सुचविण्यास व इतर सर्व बाबी तपासून नागरीकांना विश्वासत घेऊन पुढील कार्यवाही करण्यास तसेच सुचक म्हणुन श्री.पंकज भारसाखळे व श्रीमती पुष्पा निरपगारे यांचे नांव टाकण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी

**विषय क्र. ८५३:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.८३ पुंडलिकनगर शिवाजी चौक येथील शिवाजी महाराज चौकाचे दुरूस्ती व सुशोभिकरण या कामाचे अ.प.रक्कम ५ लक्ष मंजूर असुन त्याचा कार्यादेश देखील झालेला आहे. तथापी सदरील काम प्रगतीपथावर असुन हे काम अर्धवट होत आहे. तरी तेथील आवश्यकतेनुसार अंदाजपत्रकाच्या बाबींमध्ये बदल करून सदर काम मंजुर निवीदा दरानुसार चालू एजन्सीला वाढीव काम करण्यास मान्यता द्यावी व वाढीव कामासाठी वाढीव तरतुद रूपये ८ लक्ष उपलब्ध करून देण्यास्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक: श्री.सुर्यकांत जायभाये अनुमोदक:श्री.बबन नरवडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार वार्ड क्र.८३ पुंडलिकनगर शिवाजी चौक येथील शिवाजी महाराज चौकाचे दुरूस्ती व सुशोभिकरण या कामाचे अ.प.रक्कम ५ लक्ष मंजूर असुन काम प्रगतीपथावर असुन अर्धवट होत असल्याने आवश्यकतेनुसार अंदाजपत्रकाच्या बाबींमध्ये बदल करून सदर काम मंजुर निवीदा दरानुसार चालू एजन्सीला वाढीव काम करण्यास व वाढीव कामासाठी नियमानुसार वाढीव तरतुद रू. ८ लक्ष उपलब्ध करून देण्यास मंजूरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळीचे विषय

**विषय क्र.८५४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,महानगरपालिकेच्या गरवारे स्टेडिअम परिसरात जलतरण तलाव बांधणे व इतर कामाचे रक्कम रुपये २.५० कोटीच्या कामाची रीतसर निविदा कार्यवाही करुन मे. एलोरा कन्स्ट्रक्शन यांना दिनांक ११.५.२००७ अन्वये कार्यादेश देण्यात आलेले होते.

सदर प्रकल्प संदर्भाने संक्षिप्त माहिती खालील प्रमाणे आहे.

**अ)** सदरील प्रकल्प भागशः बी.ओ.टी. तत्वावर प्रस्तावीत करण्यात आला होता. सदर कामाच्या कंत्राटदाराने काम पूर्ण झाल्यानंतर पुढील तीन वर्ष प्रकल्प चालविणे,प्रकल्पापासुन मिळणारे उत्पन्न घेणे, देखभाल दुरुस्ती करणे व तीन वर्षे कालावधीनंतर महानगरपालिकेस प्रकल्प सुस्थितीत हस्तांतरित करणेचे बंधनकारक करण्यात आलेले होते.

**ब)** सदरील कामाच्या कार्यादेशानुसार कामास सुरुवात करुन सदरील ठिकाणी मुख्य जलतरण तलाव, बेबी पुल, बॅलन्सींग टँक, यांची आर.सी.सी. ची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत या कामावर आतापर्यंत एकुण रक्कम रुपये ७८.२२ लक्ष इतका खर्च झालेला आहे,त्यापैकी आजपर्यंत एजन्सीला पुंर्ण करण्यात आलेल्या कामासाठी एकुण देयकापैकी ७७% रक्कम रु. ६०.२३ लक्ष चे देयक देण्यात आलेले आहे व उर्वरित २३% रक्कम रु. १७.९९ लक्ष काम पूर्ण झाल्यानंतर टप्याटप्याने देण्यात येणार होते. सदर रक्कम महानगरपालिकेकडे जमा आहे. तशा प्रकारची अट निविदेच्या करारनाम्यानुसार घालण्यात आली होती. तत्कालीन आयुक्त यांच्या दिनांक २.८.२००८ च्या परिपत्रकान्वये (महानगरपालिकेची आर्थिक स्थिती चांगली नसल्यामुळे ) सदर प्रकल्पाचे काम सुमारे ८ ते १० महिने थांबविण्यात आले होते. त्याच प्रमाणे निधी अभावी कामाच्या १ ते ४ या दरम्यानच्या देयकांची अदायगी महानगरपालिकेतर्फे संबंधीत कंत्राटदारांस वेळेवर होऊ शकली नाही. सदर देयके देण्यात बराच विलंब झाला. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती कंत्राटदारांची देयके लगेचच पारित करण्यासारखी नसल्यामुळे ही देयके लेखा विभागाने वेळेवर पारित केली नाहीत. त्यामुळे सदरील प्रकल्पाचे काम गतीने विहीत मुदतीत पूर्ण होऊ शकले नाही.

**क)** सदरील प्रकल्प विहीत कालावधीत पुर्ण होत नसल्याने प्रकल्पाचा खर्च वाढत चाललेला होता.

**इ)** सदर प्रकल्प विहीत मुदतीत पुर्ण होत नसल्याने महानगरपालिकेने आतापर्यंत केलेला खर्च लोकोपयोगी ठरत नसल्याने म्हणजेच शहरातील जनतेला या प्रकल्पाव्दारे द्यावयाच्या सेवा सुविधांचा जो लाभ मिळावयास पाहिजे तो मिळत नसल्याने सदर प्रकल्प पुर्ण होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करणे बाबत किंवा प्रकल्प बीओटी तत्वावर सुरु करण्याची कार्यवाही करणेची सुचना मा.महापौर यांनी त्यांचे पत्र जा.क्रं मनपा/महापौर ८१५/२०१० दिनांक ०१.०२.२०१०.अन्वये केलेली होती. त्याच प्रमाणे सिडको भागातील काही स. नगर सेवकांनी देखील तशी लेखी मागणी केली होती.

**ई )** मा.महापौर यांच्या सुचनेचा विचार करुन महानगरपालिकेची आर्थिक परीस्थीती पाहता सदर प्रकल्प महानगरपालिका फंडातून पूर्ण होणे शक्य दिसत नसल्याने नागरीकांना वेळेवर सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने**,**गरवारे स्टेडीयम येथील महानगरपालिकेच्या ताब्यातील एकुण १,११,९८०.००चौ.मी.जागेपैकी मुख्य प्रशासकीय इमारती मधील बेसमेंट फ्लोअर वरील दोन बॅडमिंटन कोर्टची जागा,डॉरमेटरी इमारतीची जागा क्षेत्र ५९०.८५ चौ.मी,नियोजीत जलतरण तलाव व संलग्न बाबीसाठीचे जागा क्षेत्र ६०६६.९०चौ.मी.आणि परीसरातील खुली जागा क्षेत्र ११२३६.५३चौ.मी असे एकुण १७८९४.२८ चौ.मीटर क्षेत्र बांधा-वापरा-हस्तांतरीत करा(बी.ओ.टी)तत्वावर विकासकास ३५ वर्षासाठी विहीत नमुद अटी व शर्तीनुसार देण्याच्या प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर करण्यात आला होता त्यावर मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र. १०१४ दिनांक २०.२.२०१० नुसार खालील अटी व शर्तीसह प्रस्तावास मंजुरी दिलेली होती.

१) विकासकास सदरील प्रकल्पातील मुळ प्रस्तावात असलेली विकास कामे व संलग्न सुविधा तसेच नव्याने सुचविलेल्या सेवा सुविधा स्वखर्चाने सर्व प्रथम पूर्ण करणे बंधनकारक राहील.

२) विकासकास प्रस्तावित असलेली मुळ कामे सदर कामाचे मुळ गुत्तेदार मे. एलोरा कन्स्ट्रक्शन यांच्याकडून पूर्ण करुन घेणे आवश्यक असुन या कामासाठी महानगरपालिकेला कोणत्याही प्रकारचे देणे लागणार नाही.

३) विकासकास सदरील प्रकल्पावर आतापर्यंत झालेल्या खर्चाची रक्कम रु.७८.२२ लक्ष महानगरपालिकेस करारनामा झाल्यानंतर ३ महिन्याच्या आत एक रकमी भरणा करणे बंधनकारक राहील. विहीत मुदतीत रक्कम भरणा न केल्यास मुदतीनंतरच्या कालावधीसाठी १८% दराने व्याज आकारण्यात येईल.

४) विकासकास मुळ प्रस्तावानुसार सदर प्रकल्पातील उर्वरीत कामे मे.एलोरा कन्स्ट्रक्शन यांच्या मार्फत करुन घेणे आणि पूर्णत्वानंतर पुढील ३ वर्षाच्या कालावधीसाठी देखभाल दुरुस्तीची संपूर्ण जबाबदारी मुळ मक्तेदार मे. एलोरा कन्स्ट्रक्शन यांची असल्याने त्या अनुषंगाने मे. एलोरा कन्स्ट्रक्शन, महानगरपालिका आणि विकासक यांच्या त्रिपक्षिय (Tripartiet Agreement) स्वतंत्र नोंदणीकृत करारनामा करुन सदर करारनामा महानगरपालिकेकडे सादर करणे बंधनकारक राहील सदर करारनाम्याचा मसुदा महानगरपालिकेकडून संमत करुन घ्यावा लागेल.

५) विकासकाने या ठिकाणी निर्माण केलेल्या तसेच उपलब्ध करुन दिलेल्या सर्व सोयी सुविधा चालविण्यासाठी त्रयस्थ व्यक्ती /संस्थांना चालवावयास दयावयाच्या असल्यास महानगरपालिकेची पूर्व संमती घेणे आवश्यक राहील.

६) विकासकास या प्रकल्पासाठी महानगरपालिकेस देय असलेली पाणी पट्टी, मालमत्ता कर आणि इतर / विद्युत देयके नियमानुसार भरणा करावा लागतील.

७) विकासकास महानगरपालिकेच्या नगर रचना विभागाच्या परवानगी नुसार देय असलेले चटई निर्देशांक क्षेत्र (FSI) नियमानुसार शुल्क भरुन विकसीत करता येईल.

८) विकासकास जलतरण तलावासाठी व इतर सोयी सुविधेसाठी लागणारा पाणी पुरवठा व विद्युत व्यवस्था स्वखर्चाने करावी लागेल.

९) विकासकास सदरील ठिकाणी जलतरण तलाव व मुळ प्रस्तावातील बाबी व्यतिरिक्त खालील सुविधा पुरविणे बंधनकारक राहील त्यासाठीची आवश्यक परवानगी विकास नियंत्रण नियमावलीनुसार देय राहील.

(अ) स्टीम व सौना बाथ,जॅकुझी (पुरुष व स्त्रियांसाठी वेगवेगळे स्वतंत्र).
(ब) चिल्ड् शॉवर (पुरुष व स्त्रियांसाठी वेगवेगळे स्वतंत्र).
(क) स्क्वॅश कोर्ट.
(ड) चिल्ड्रन प्ले एरीया(स्मॉल अम्युजमेंट पार्कसह).
(इ) फुड मॉल.
(फ) स्पा सेंटर / नॅचरोपॅथी सेंटर सह.
(ग) योगा सुविधा.
(ह) स्वागत कक्ष आणि प्रशासकीय इमारत(फक्त तळमजला).
(ई) जॉगींग ट्रॅक.

या शिवाय विकासकास नक्षत्र उदयान,थ्रीडी थियेटर,मिनीप्लेक्स,अँक्युप्रेशर,पाथवे,कॉन्फरन्स हॉल इत्यादी सुविधेबाबत नगररचना विभागाच्या नियमानुसार परवानगी देय राहील.तथापी या बाबी ऐच्छीक राहतील.

१०) विकासकासाठी या ठिकाणी देण्यात येणाऱ्या जागेचे भाडे खालील प्रमाणे आकारण्यात येईल.

अ) गरवारे जलतरण तलाव येथे बांधलेल्या व प्रस्तावीत बांधीव क्षेत्रा करीता तसेच वापरात असणाऱ्या (Usable area) क्षेत्रा करीता किमान रक्कम रु.२०.०० प्रती चौ.मी. प्रती महीना आकारण्यात येईल. त्यात दर ३ वर्षाने मुळ रक्कमेत १०% ने वाढ करण्यात येईल.

ब) गरवारे जलतरण तलाव येथील खुल्या जागेच्या क्षेत्रा करीता किमान रक्कम रु. ३.०० प्रती चौ.मी. प्रती महीना आकारण्यात येईल.

११) विकासकास या ठिकाणी पुरविलेल्या तसेच बांधलेल्या सर्व सुविधांसाठी शुल्क आकारणी करणे बाबतचे अधिकार महानगरपालिकेच्या संमतीने देण्यात येतील.

१२) विकासकास सर्व सुविधांची, इमारतीची व परिसराची दैनंदिन देखभाल दुरुस्ती स्वखर्चाने करावी लागेल.

१३) विकासकास देण्यात आलेल्या संपूर्ण परिसरामध्ये स्वखर्चाने वृक्षारोपन करुन त्याचे संगोपन करावे लागेल.

१४) विकासकास संपूर्ण सोयी सुविधा विहित मुदतीनंर विना अट महानगरपालिकेकडे सुस्थितीत हस्तांतरीत कराव्या लागतील.

१५) विकासकाने नमुद अटी व शर्तीचे उल्लघंन केल्याचे निदर्शनास आल्यास करारनामा रद्द करण्याचे सर्वस्वी अधिकार आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांना राहतील.

१६) विकासकास हस्तांतरीत करण्यात येणाऱ्या परिसरात निर्धारीत करुन देण्यात येणाऱ्या सुविधा व्यतिरिक्त कोणत्याही नियमास बाधक ठरणारा उपक्रम राबविता येणार नाही.

१७) विकासकास हस्तांतरीत करण्यात येणाऱ्या परिसरात होणाऱ्या कोणत्याही दुर्घटनेची जबाबदारी महानगरपालिकेची राहणार नाही.

१८) विकास काम पूर्ण झाल्यावर ६ महीन्याने मुळ कंत्राटदारास सुरक्षा अनामत परत करण्यात येईल त्याच वेळेस विकासकास रु. १०.०० लक्ष रक्कम महानगरपालिकेकडे धनाकर्ष स्वरुपात सुरक्षा अनामत म्हणून (बिनव्याजी जमा करावी लागेल.)

**ख )** मा.सर्वसाधारण सभेच्या दिनांक २०.२.२०१० च्या ठरावा नुसार रितसर निविदा कार्यवाही अंतर्गत या विभागाचे जा.क्र/मनपा/उप.अभियंता/इवउबां/८१६/२०१० दिनांक २२.०२.२०१० नुसार गरवारे स्टेडीयम परीसरात जलतरण तलाव व इतर संलग्न सुविधा पुरविने/बांधणे च्या रक्कम रुपये ४७५.००लक्षच्या निविदेस व्यापक प्रसिध्दी मिळण्यासाठी राज्य पातळीवरील वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आलेली होती.

**घ ) सदर निविदा सुचनेची थोडक्यात माहीती खालील प्रमाणे.**

१. सदरील प्रकल्पामध्ये औरंगाबाद महानगरपालिकेची वर नमुद केल्यानुसार जमीन व इमारत ३५ वर्ष भाडे करारावर देणे

२. निविदा तीन लिफाफा पध्दतीत सादर करणे.

३. विकासकाची निवड त्याची आर्थिक क्षमता ,अनुभव व चांगल्या संकल्पना विचारात घेवुन करणे.

४. निविदा पुर्व बैठक:- दिनांक ४.३.२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता.महानगरपालिका आयुक्त कार्यालय येथे आयोजित केली होती.

५. सदर कामाच्या कोऱ्या निविदा विक्री दिनांक २५.०२.२०१० ते ११.३.२०१० रोजी दुपार १.०० वाजेपर्यंत .स्थळ-कार्यकारी अभियंता(ब/क)यांचे कार्यालयात ठेवली होती.

६. सदर कामाची निविदा स्विकृती दिनांक २५.२.२०१० ते ११.३.२०१० रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत लेखा विभागात ठेवण्यात आली होती.

७. प्राप्त निविदा उघडण्याची वेळ:- दिनांक ११.३.२०१० रोजी दुपारी ३.०० वाजेनंतर ठेवण्यात आली होती.

८. कुठलीही निविदा टपालाव्दारे पाठविली जाणार नाही अथवा स्विकारली जाणार नाही. असे कळविण्यात आले होते.

९. प्राप्त निविदांपैकी एक किंवा सर्व निविदा कुठलेही कारण न दर्शविता स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांचे राहतील. असे कळविण्यात आले होते

**प )** उपरोक्त प्रमाणे गरवारे स्टेडीयम परिसरात जलतरण तलाव बांधणे व इतर संलग्न सुविधा पुरविणे या करीता बी.ओ.टी. तत्वावर दिनांक २२.२.२०१० रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली.

**फ )** सदरील कामाच्या संदर्भाने दिनांक ४.३.२०१० रोजी निविदा पूर्व बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदरील बैठकीस M/s PPP Ventures, M/s Krish International, M/s Raka Associates उपस्थित होते.

**भ )** सदरील कामाच्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत (दि.११.३.२०१० ) एकुण ४ (चार ) निविदा विक्री झाल्या त्यांचा तपशिल पुढील प्रमाणे. १. M/s PPP Ventures, २. M/s Krish International, ३. M/s Raka Associates ४. M/s Rajesh Bharuka तसेच निविदा स्वीकृतीचा अंतिम दिनांक ११.३.२०१० रोजी दु. १.०० वाजेपर्यंत खालील प्रमाणे एकुण तिन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या होत्या.

३. M/s Raka Associates
२. M/s Rajesh Bharuka
३. M/s PPP Ventures

**म)** तदनंतर महानगरपालिका निवडणुकीची आचार संहिता लागु झाल्यामुळे तसेच मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र १०१४ दिनांक २६.४.२०१० नुसार सदरील काम बीओटी तत्वावर न करता महानगरपालिकेच्या फंडातुन करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला त्यामुळे निविदा उघडण्यात आल्या नाहीत.

**य)** तसेच मा.सर्वसाधारण सभेने निर्देशीत केल्यानुसार सदरील कामासाठी आर्थिक वर्ष सन २०१०-२०११ अंतर्गत रक्कम रुपये १.५० कोटीची कागदोपत्री तरतुद ठेवण्यात आली. तथापी प्रत्यक्षात निधी उपलब्ध झाला नाही.

**र)** सध्याची महानगरपालिकेची आर्थिक स्थिती विचारात घेता हा प्रकल्प महानगरपालिकेच्या निधी मधुन विकसित होणे नजीकच्या काळात शक्य दिसत नसल्याने महानगरपालिकेने प्रकल्पावर केलेला खर्च प्रकल्पाच्या विना वापरामुळे (अर्धवट स्थितीमुळे) उपयोगात येत नाही. परीणामी नागरीकांना या प्रकल्पाचा/सोयींचा उपभोग घेता येत नाही. त्या मुळ कंत्राटदारांशी वारवांर चर्चा करुन त्यांनी या प्रकरणी न्यायालयात जाण्याची पाऊले उचलु नयेत म्हणुन त्यांना विनंती करण्यात आलेली आहे. तथापी या प्रकल्पाच्या विकासासंदर्भाने योग्य निर्णय लवकरात लवकर झाला नाही तर हा प्रकल्प न्यायालयीन प्रक्रियेत अडकु शकतो आणि मुळ कंत्राटदारास दयावा लागणा-या संभाव्य नुकसान भरपाईमुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान संभवते.

**व)** यास्तव दिनांक १८.८.२०११ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेत झालेल्या चर्चेनुसार महानगरपालिकेच्या गरवारे स्टेडिअम परिसरात जलतरण तलाव बांधणे व इतर संलग्न कामे करणे बाबतचा प्रकल्प हा पुनःश्च **बांधा - वापरा व हस्तांतरीत करा (BOT)**या तत्वावर विकसित करणे बाबत मा.सर्वसाधारण सभेने आदेशीत केल्यानुसार याबाबतचा सविस्तर प्रस्ताव खालील विहीत अटी व शर्तीनुसार मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात येत आहे.

**<u>अटी व शर्ती:-</u>**

**१) विकासकास सदरील प्रकल्पासाठी जमीन व इमारत ३० वर्ष भाडे करारावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे तसेच** सदरील प्रकल्पातील मुळ प्रस्तावात असलेली मात्र अदयाप पूर्ण न झालेली सर्व विकास कामे व संलग्न सुविधा तसेच नव्याने सुचविलेल्या सेवा सुविधा स्वखर्चाने पुर्ण करणे बंधनकारक राहील.

**२)** प्रस्तावित कामाचे मुळ मक्तेदार मे.एलोरा कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे काम आहे त्या स्थितीत अंतिम न करता मुळ निविदा अटी / शर्ती नुसार पूर्ण करुन घ्यावे. मुळ अटी/शर्तीनुसार करुन घेतलेल्या कामांचा खर्च नव्याने येणाऱ्या विकासकाने सोसावा.

**३)** सदर प्रकल्पासाठीचे मुळ अंदाजपत्रक सा. बां. खात्याच्या सन २००५-०६ च्या दरसुची प्रमाणे तयार करण्यात आले होते. तसेच प्रकल्पावर महानगरपालिकेने आतापर्यंत रक्कम रु. ७८.२२ लक्ष चा दिनांक

३१.१२.२००९ पर्यंत खर्च केला आहे. तथापि मा. आयुक्त महोदय यांनी गठीत केलेल्या समिती मध्ये झालेल्या चर्चेनुसार सदर कामावर झालेल्या खर्चाची देय रक्कम जी काही होईल तेवढया रक्कमे एवढा खर्च निविदा प्रक्रीयेत यशस्वी झालेल्या विकासकाने करारनामा झाल्यानंतर ३ महिन्याच्या आत एक रकमी महानगरपालिकेत भरणा करणे बंधनकारक राहिल. विहीत मुदतीत रक्कम भरणा न केल्यास मुदतीनंतरच्या कालावधीसाठी १८ % दराने व्याज आकारण्यात येईल .

**४)** मे. एलोरा कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्या मुळ निविदेच्या रु. २.५० कोटी रक्कमेच्या मर्यादेपर्यंत (निविदेनुसार) त्यांच्याशी केलेला करारनामा अस्तित्वात राहणार असल्याने नविन BOT प्रकल्पासाठी औरंगाबाद महानगरपालिका / विकासक / आणि मे. एलोरा कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्यात करावयाच्या त्रिपक्षीय करारनाम्याचा मसुदा विकासकाने महानगरपालिकेकडे सादर करुन तो संमत करुन घेणे विकासकास बंधनकारक राहील. तदनंतर या करारनाम्याची नोंदणी दुय्यम निबंधक कार्यालयात करण्यात येईल. नोंदणीचा खर्च १००% विकासक करील.

**५)** विकासकाने या ठिकाणी निर्माण केलेल्या तसेच उपलब्ध करुन दिलेल्या सर्व सोई-सुविधा चालविण्यासाठी त्रयस्थ व्यक्ती/संस्थांना नेमावयाचे असल्यास विकासकास महापालिका आयुक्तांची पुर्व संमती घेणे आवश्यक राहिल.

**६)** या प्रकल्पासाठी महानगरपालिकेस देय असलेली पाणीपटटी ,मालमत्ताकर आणि इतर कर/विदयुत देयके नियमानुसार विकासकास भरणा करावे लागतील.

**७)** महानगरपालिकेच्या नगररचना विभागाच्या परवानगीनुसार देय असलेल्या चटई क्षेत्र निर्देशांकानुसार नियमानुसार शुल्क भरुन विकासकास प्रकल्प विकसीत करता येईल.

**८)** जलतरण तलावासाठी व इतर सोईसुविधेसाठी लागणारा पाणीपुरवठा व विदयुत व्यवस्था विकासकास स्वखर्चाने निर्माण करावी लागेल.

**९)** सदरील ठिकाणी जलतरण तलाव व मुळ प्रस्तावातील बाबींव्यतिरीक्त खालील सुविधा पुरविणे विकासकास बंधकारक राहिल. त्यासाठीची आवश्यक परवानगी विकास नियंत्रण नियमावलीनुसार देय राहील.

(अ) स्टीम व सौना बाथ,जॅकुझी (पुरुष व स्त्रियांसाठी वेगवेगळे स्वतंत्र).
(ब) चिल्ड् शॉवर (पुरुष व स्त्रियांसाठी वेगवेगळे स्वतंत्र).
(क) स्क्वॅश कोर्ट.
(ड) चिल्ड्रन प्ले एरीया(स्मॉल अम्युजमेंट पार्कसह).
(इ) फुड मॉल.
(फ) स्पा सेंटर / नॅचरोपॅथी सेंटर सह.
(ग) योगा सुविधा.
(ह) स्वागत कक्ष आणि प्रशासकीय इमारत(फक्त तळमजला).
(ई) जॉगींग ट्रॅक.

या शिवाय विकासकास नक्षत्र उदयान,थ्रीडी थियेटर, मिनीप्लेक्स, अँक्युप्रेशर, पाथवे, कॉन्फरन्स हॉल इत्यादी सुविधेबाबत नगररचना विभागाच्या नियमानुसार परवानगी देय राहील.तथापी या बाबी विकासकासाठी ऐच्छीक राहतील.

**१०.** विकासकास या ठिकाणी देण्यात येणा-या जागेचे भाडे MIDC च्या नियमानुसार खालील प्रमाणे आकारण्यात येईल.

**(अ)** गरवारे जलतरण तलाव येथे बांधलेल्या व प्रस्तावित बांधीव क्षेत्रा करीता तसेच वापरात असणा-या ( usable area ) क्षेत्रा करिता किमान रक्कम रुपये ४०.०० प्रति.चौ.मी.प्रति महिना राहील आणि या मध्ये दर तीन वर्षानी १० % ने वाढ करण्यांत येईल .

**(ब)** गरवारे जलतरण तलाव येथील खुल्या जागेच्या क्षेत्राकरीता किमान रक्कम रुपये = भूखंड वाटपाचा दर xप्लॉट एरिया x ३ % प्रती वर्ष राहील यात दर तीन वर्षानी मुळ रक्कमेत १० % ने वाढ करण्यांत येईल .

**( क)** विकासकास उपरोक्त भाडे आकारणी नुसार सदरील ठिकाणच्या अस्तित्वातील बॅडमिंटन कोर्ट व डार्मेटरी इमारतीचे बांधीव क्षेत्रा करिता

**१)** ५९०.८५ चौ.मि.x रु. ४०x १२ = रु. **२,८३,६०८** प्रति वर्ष

**२)** जलतरण तलाव व अन्य बांधकाम क्षेत्र ६०६६.९० चौ.मी.x रु. ४० X१२ =रु.**२९,१२,११२**प्रति वर्ष

**३)** खुली जागा क्षेत्र ११२३६.५३ चौ.मी.x २३९५x३% = **८,०७,३४५=००** प्रति वर्ष.

या प्रमाणे एकूण रुपये **४०,०३,०६५=००** प्रती वर्ष भाडे महानगरपालिकेस दयावे लागेल सदरील भाडयामध्ये दर तीन वर्षानी १०% वाढ करण्यात येईल.

**११)** विकासकास या ठिकाणी पुरविलेल्या तसेच बांधलेल्या सर्व सुविधांसाठी शुल्क आकारणी करण्याबाबतचे अधिकार महानगरपालिकेने ठरविलेल्या दराने व समंतीने देण्यात येतील.

**१२)** विकासकास सर्व सुविधांची ,इमारतींची व परीसराची दैनंदिन देखभाल दुरुस्ती स्वखर्चाने करावी लागेल.

**१३)** विकासकास देण्यात आलेल्या संपुर्ण परीसरामध्ये वृक्षारोपण करुन त्याचे संगोपन करावे लागेल.

**१४)** विकासकास संपुर्ण सोई-सुविधा जागेसह (क्षेत्र ११२३६.५३ चौ.मी.) तसेच बांधीव क्षेत्र ५९०.८५ चौ.मी. आधिक ६०६६.९० चौ.मी. ३० वर्षाच्या concession period नंतर विनाअट महानगरपालिकेकडे सुस्थितीत हस्तांतरीत कराव्या लागतील.

**१५)** Concession period दरम्यान विकासकाने नमुद अटी व शर्तीचे उल्लघंन केल्याचे निदर्शनास आल्यास करारनामा रद्द करण्याचे अधिकार सर्वस्वी आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांचे राहतील.

**१६)** विकासकास हस्तांतरित करण्यांत येणा-या परिसरात निर्धारीत करुन देण्यात येणा-या सुविधां व्यतिरिक्त शासन / महानगरपालिकेच्या प्रचलित अशा कोणत्याही नियमास बाधक ठरणारा उपक्रम राबविता येणार नाही .

**१७)** विकासकास हस्तांतरित करण्यांत येणा-या परिसरात होणा-या कोणत्याही दुर्घटनेची जबाबदारी महापालिकेची राहणार नाही . ही जबाबदारी पूर्णतः विकासकाची राहील. यात कोणास नुकसान भरपाई दयावयाची झाल्यास ती जबाबदारी विकासकाची राहील.

**१८)** विकासकास हस्तांतरीत करण्यात येणाऱ्या तसेच विकासकाने विकसीत केलेल्या संपूर्ण प्रकल्पाचा विमा स्वखर्चाने काढणे विकासकास बंधनकारक राहील तसेच वेळोवेळी विम्याचे नुतनीकरण करावे लागेल.

**१९)** विकास काम पुर्ण झाल्यानंतर सहा महिन्याने मुळ कंत्राटदारास सुरक्षा अनामत परत करण्यांत येईल त्याच वेळेस विकासकास रु.१०.०० लक्ष रक्कम महापालिकेकडे धनाकर्ष स्वरुपात सुरक्षा अनामत म्हणून (बिन व्याजी )जमा करावी लागेल .

**२० )** विकासकास सदर प्रकल्पावर Premium न घेता पूर्णतः भाडे आकारणी करण्यात येणार आहे त्या करीता महानगरपालिकेने ३० वर्षे भाडे कराराचा कालावधी (Concession period) ठरवलेला आहे. तथापि विकासक किती वर्षांकरीता Concession घेणार आहे त्या नुसार विकासकाचा निकष ठरवण्यात येईल.

करीता वरील नुसार विहीत अटी व शर्ती नुसार महानगरपालिकेच्या वास्तूविशारद पॅनल वरील आर्किटेकची PMC म्हणून नेमणूक करण्यात येऊन गरवारे स्टेडिअम परिसरात जलतरण तलाव बांधणे व सोयी सुविधा निर्माण करणेची इतर संलग्न कामे करणे बाबतचा प्रकल्प पुनश्च **बांधा - वापरा व हस्तांतरीत करा (BOT)**या तत्वावर राबविणे तसेच या करीता नव्याने **EXPRESSION OF INTEREST (EOI)** स्वारस्य देकार मागवुन प्रकल्प विकसित करणे ची परवानगी मिळणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवादः**

मा.महापौर　　:मंजूर

<u>ठराव :</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या गरवारे स्टेडीयम परिसरात जलतरण तलाव बांधणे व इतर कामाचे रक्कम रूपये २.५० कोटीच्या कामाची रीतसर निविदा कार्यवाही करून मे. एलोरा कन्स्ट्रक्शन यांना दिनांक ११ -५-२००७ अन्वये दिलेले कार्यादेश व प्रकल्प संदर्भाने प्रस्तावात संक्षिप्त नमुद केलेली माहिती अ,ब,क,इ,,तसेच ई मधील १ ते १८ तसेच ख, आणि घ,मध्ये १ ते ९ नमुद केल्यानुसार तसेच प, फ, भ, म, य, र, मधील माहितीचा विचार करता प्रस्तावात व) नुसार
नमुद केल्याप्रमाणे गरवारे स्टेडिअम परिसरात जलतरण तलाव बांधणे व इतर संलग्न कामे करणे बाबतचा प्रकल्प हा पुनःश्च बांधा-वापरा व हस्तांतरीत करा (BOT) या तत्वावर विकसित करणे करीता प्रस्तावात नमुद अटी व शर्ती १ ते २० नुसार महानगरपालिकेच्या वास्तूविशारद पॅनल वरील आर्किटेकची PMC म्हणून नेमणूक करण्यात येऊन गरवारे स्टेडिअम परिसरात जलतरण तलाव बांधणे व सोयी सुविधा निर्माण करणेची इतर संलग्न कामे करणे बाबतचा प्रकल्प पुनश्च बांधा-वापरा व हस्तांतरीत करा (BOT) या तत्वावर राबविणे तसेच या करीता नव्याने EXPRESSION OF INTEREST(EOI) स्वारस्य देकार मागवुन प्रकल्प विकसित करणेची परवानगीस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>विषय क्रमांक.८५५:</u>

**प्रस्ताव सादर करण्यात येतो की, यापुर्वी सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.५७१ दिनांक २०/१२/२०११ झालेल्या मा.सर्वसाधारण सभेत आस्थापना विभागास दिलेल्या निर्देशानुसार महानगरपालिकेच्या दैनिक वेतनावरील वर्ग-४ कर्मचाऱ्यांना कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-२/१४५/२०१२ दिनांक २१/०१/२०१२ रोजीच्या आदेशान्वये दिनांक ३०/१०/२०११ पर्यंत सहा महिन्याची मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत मनपा आस्थापना वरील वर्ग-४ संवर्गातील खालील कर्मचारी कार्यरत आहे. तसेच जा.क्र/मनपा/आस्था-१/२०११/१६५३ दि.१५/११/२०११ अन्वये दै.वेतनावर कार्यरत कर्मचा-यांना ६व्या वेतन आयोगानुसार निश्चित केलेल्या दै.वेतनाच्या दरानुसार वर्ग-४ संवर्गातील कर्मचा-यांना रु. २१८/- ऐवजी रु. २९५/- सुधारीत दै. वेतनास मंजुरी देण्यात आलेली आहे.**

| अ.क्र | कर्मचाऱ्यांचे नांव (सर्वश्री/श्रीमती) | पदनाम | कार्यरत विभाग | ठराविक/ दैनिक वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती.मंदाबाई तुकाराम दांडगे | दै.वे.सेविका | प्रकल्प विभाग | रु. २९५/ |
| २ | दिपक शेषराव दाभाडे | दै.वे.सेवक | मा.उपआयुक्त (म) दालन | रु. २९५/ |
| ३ | रविंद्र प्रभाकर देवकर | दै.वे.वॉचमन | मालमत्ता विभाग | रु. २९५/ |
| ४ | स.शहाबुद्यीन स.जकरूद्यीन | दै.वे.वॉचमन | मालमत्ता विभाग | रु. २९५/ |
| ५ | रमेश सखाराम जाधव | दै.वे.वॉचमन | मालमत्ता विभाग | रु. २९५/ |
| ६ | सुनिल धर्माजी भुजंगे | दै.वे.वॉचमन | मालमत्ता विभाग | रु. २९५/ |
| ७ | रविंद्र विठ्ठल कांबळे | दै.वे.सेवक | रमानगर वाचनालय | रु. २९५/ |
| ८ | नारायण शिवनाजी सपाटे | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| ९ | रमेश दत्तु देवडे | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| १० | विनोद पांडूरंग तुपे | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| ११ | सुधाकर आसाराम त्रिंभुवन | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| १२ | गोविंद कृष्णराव साळवे | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| १३ | संजय विठ्ठल इंगळे | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| १४ | समिंदर रमेश | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| १५ | प्रल्हाद गुंजाळे | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रु. २९५/ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६ | कडूबा औताडे | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| १७ | मिलिंद दत्तोपंत आम्ले | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| १८ | सिध्दार्थ पांडूरंग दांडगे | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| १९ | सतिश सोमाजी गडवे | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| २० | सर्जेराव शिंदे | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| २१ | सुभाष निलकंठ | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| २२ | रामेश्वर फुलारे | दै.वे.सेवक | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| २३ | कमलबाई शिवन्ना गुडम | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| २४ | कमलबाई भिमराव साळवे | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| २५ | रंजना तुळशीराम मोरे | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| २६ | लताबाई कारभारी | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| २७ | शहनाज बेगम रशिद खॉं | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| २८ | इंदुबाई पांडूरंग दांडगे | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| २९ | इंदुबाई राजुरे | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| ३० | मंगलाबाई मिश्राम | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| ३१ | चंद्रकला शंकर आम्ले | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| ३२ | उषा सुनिल घोगरे | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| ३३ | संध्या श्याम साळवे | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| ३४ | सुनिता किसन साळवे | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| ३५ | मलेका शाहीन शे.जलील अहेमद | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| ३६ | जकीया बेगम अ.हमीद | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| ३७ | यशोधरा नामदेव वसाटे | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| ३८ | विद्या मनोहर शेळवणे | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| ३९ | शारदाबाई सदाशिव जगधने | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| ४० | छायाबाई अशोक म्हस्के | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| ४१ | शारदाबाई दलबहादुरसिंग ठाकुर | दै.वे.सेविका | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| ४२ | राजेश प्रभाकर पवार | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| ४३ | चंद्रमणी समाधान गवई | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| ४४ | रावसाहेब जाधव | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| ४५ | कुदन काशिनाथ गणोरे | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| ४६ | मनोज लखनलाल तुळशीबागवाले | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| ४७ | रविंद्र खापे | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| ४८ | संदिप सुभाष घाग | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| ४९ | प्रल्हाद विठ्ठल करडे | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| ५० | साहेबराव मुक्ताजी गायकवाड | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| ५१ | शे.करीम शे.हुसेन | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| ५२ | विजय पंडीतराव गायकवाड | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| ५३ | अय्युब खॉं सांडू खॉं | दै.वे.चौकीदार | शिक्षण विभाग | रू. २९५/ |
| ५४ | रमेश चंद्रय्या परके | दै.वे.विद्युत लाईनमन | विद्युत विभाग | रू. ३६५/ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५५ | अण्णासाहेब दाणे | दै.वे.विद्युत लाईनमन | विद्युत विभाग | रु. ३६५/ |
| ५६ | कैलास श्रीपत बनकर | दै.वे.विद्युत लाईनमन | विद्युत विभाग | रु. ३६५/ |
| ५७ | असलम खान मुकीद खान | दै.वे.मजूर | निवडणूक विभाग | रु. २९५/ |
| ५८ | इलियास अ.बसरावी | दै.वे.मदतनीस | यांत्रिकी विभाग | रु. २९५/ |
| ५९ | मो.युसुफ़ मो.उस्मान | दै.वे.मदतनीस | यांत्रिकी विभाग | रु. २९५/ |
| ६० | मो.आसेफ़ मो.खालेद | दै.वे.मदतनीस | यांत्रिकी विभाग | रु. २९५/ |
| ६१ | शेख इम्रान शेख फ़जलोद्दीन | कक्ष सेवक | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ६२ | गयासोद्दीन | कक्ष सेवक | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ६३ | विमलबाई भुईगड | सेविका | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ६४ | राजेंद्र दिनकर कुंभारीकर | सहाय्यक | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ६५ | सौ.जयश्री वसंत | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु. ३६५/ |
| ६६ | विलास दत्तू नाईक | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु. ३६५/ |
| ६७ | सुरेश दामोधर नलावडे | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु. ३६५/ |
| ६८ | श्रीमती.जिजाबाई नवगिरे | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ६९ | श्रीमती.पार्वता दाडेकर | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ७० | भरत पचलोरे | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु. ३६५/ |
| ७१ | सुभाष दत्तात्रय सुरासे | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु. ३६५/ |
| ७२ | मुंढे भानुदास नरसू | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु. ३६५/ |
| ७३ | कमल कचरु मोरे | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु. ३६५/ |
| ७४ | भोसले पंढरीनाथ | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु. ३६५/ |
| ७५ | नारायण शेषराव जंगले | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु. ३६५/ |
| ७६ | वाचा सुंदर संतोष | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु. ३६५/ |
| ७७ | निकम शांताराम नारायण | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु. ३६५/ |
| ७८ | तनवीर खान नियाजी | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ७९ | शेख हबीब लाल | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु. ३६५/ |
| ८० | मनिषा किसनराव पाटील | दै.वे.नोंदणी लिपीक | आरोग्य विभाग | रु. ३६५/ |
| ८१ | फ़िरोज खान गणी खान | दै.वे.वॉर्डबाय | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ८२ | मोहमंद सज्जाद सईद अन्सारी | दै.वे.वॉर्डबाय | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ८३ | परवेश अण्णाजी मिसाळ | दै.वे.वॉचमन | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ८४ | युवराज लांडगे | दै.वे. सेवक | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ८५ | निरु कृष्णा गवळे | दै.वे. सेवक | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ८६ | पुष्पलता सावंत | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु. २९५/ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८७ | जाधव सखुबाई शंकर | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ८८ | गायकवाड मिना गणपत | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ८९ | वाघ सखुबाई आसाराम | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ९० | काळे मिनाबाई काशिनाथ | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ९१ | फुले धुरपताबाई सांडू | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ९२ | फ़िरंगी लिला नरसिंग | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ९३ | कांबळे शोभा साहेबराव | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ९४ | के.डब्ल्यु.पोपलवार | दै.वे. सेविका | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ९५ | विजय गोविंद साबळे | प्रयोग सहाय्यक | आरोग्य विभाग | रु. २९५/ |
| ९६ | दिलीप श्रीधर ठोंबरे | दै.वे.मजूर | अग्निशमन विभाग | रु. २९५/ |
| ९७ | बाबासाहेब रंजाजी कांबळे | दै.वे.हमाल | वॉर्ड-ब कार्यालय | रु. २९५/ |
| ९८ | राजेश दिपचंद लाहोट | दै.वे.स्वीपर | वॉर्ड-क कार्यालय | रु. २९५/ |
| ९९ | किशोर विनायक साबळे | दै.वे.मजूर | वॉर्ड-क कार्यालय | रु. २९५/ |
| १०० | नदिम अख्तर | दै.वे.मजूर | वॉर्ड-क कार्यालय | रु. २९५/ |
| १०१ | विष्णू नारायण काळे | दै.वे.मजूर | वॉर्ड-क कार्यालय | रु. २९५/ |
| १०२ | मिर्झा अन्वर बेग | दै.वे.मजूर | वॉर्ड-क कार्यालय | रु. २९५/ |
| १०३ | बाबासाहेब निवृत्ती बनसोडे | दै.वे.मजूर | वॉर्ड-क कार्यालय | रु. २९५/ |
| १०४ | फेरोज अहमद मुस्ताफ अ.खान | दै.वे.वॉचमन | वॉर्ड-क कार्यालय | रु. २९५/ |
| १०५ | गणेश साहेबराव अजगरे | दै.वे.मजूर | वॉर्ड-ड कार्यालय | रु. २९५/ |
| १०६ | अनिल येडूबा साळवे | दै.वे.मजूर | वॉर्ड-ड कार्यालय | रु. २९५/ |
| १०७ | लताबाई अशोक साळवे | दै.वे.मजूर | वॉर्ड-ड कार्यालय | रु. २९५/ |
| १०८ | संजय शामराव ठोबरे | दै.वे.मजूर | वॉर्ड-ड कार्यालय | रु. २९५/ |
| १०९ | मोहमंद मुदस्सीर शेख बशीर | दै.वे.मजूर | वॉर्ड-ई कार्यालय | रु. २९५/ |
| ११० | शेख जावेद शे.जाफर | दै.वे.मजूर | वॉर्ड-ई कार्यालय | रु. २९५/ |
| १११ | श्रीमती.रमादेवी भगवान म्हस्के | दै.वे.सेविका | वॉर्ड-ई कार्यालय | रु. २९५/ |
| ११२ | राजु रामचंद्र बडे | दै.वे.मजूर | वॉर्ड-ई कार्यालय | रु. २९५/ |
| ११३ | द्वारकाबाई नाना अडागळे | दै.वे.मजूर | वॉर्ड-ई कार्यालय | रु. २९५/ |
| ११४ | चतुराबाई भिमराव हतागळे | दै.वे.मजूर | वॉर्ड-ई कार्यालय | रु. २९५/ |
| ११५ | दौलत किसन सलामबाद | मजूर | वॉर्ड-फ कार्यालय | रु. २९५/ |
| ११६ | रविंद्र शामसुंदर कांबळे | दै.वे.मजूर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु. २९५/ |
| ११७ | संजय रतन खरे | दै.वे.मजूर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु. २९५/ |
| ११८ | किशोर खुशाल रामटेके | दै.वे.मजूर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु. २९५/ |
| ११९ | अतुल हरीचंद्र फुलके | दै.वे.मजूर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु. २९५/ |
| १२० | शोभाबाई दिलीप साळवे | दै.वे.मजूर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु. २९५/ |
| १२१ | जाईबाई साहेबराव साळवे | दै.वे.मजूर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु. २९५/ |
| १२२ | हौसाबाई रामभाऊ वडमोर | दै.वे.मजूर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु. २९५/ |
| १२३ | मिनाबाई दामोधर सोनवणे | दै.वे.मजूर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु. २९५/ |
| १२४ | पुष्पाबाई जानकु त्रिभुवन | दै.वे.मजूर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु. २९५/ |
| १२५ | सावित्रीबाई भगवान मगरे | दै.वे.मजूर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु. २९५/ |
| १२६ | कांताबाई अंबादास पटेकर | दै.वे.मजूर | वॉर्ड-फ़ कार्यालय | रु. २९५/ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२७ | विजय लक्ष्मणराव देशपांडे | वॉचमन | भारत माता मंदिर | रु. २९५/ |
| १२८ | सुनिल किसनराव दाभाडे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १२९ | सतिश केशव बनकर | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १३० | राजेंद्र भागाजी नवगिरे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १३१ | मिलींद धनाजी गायकवाड | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १३२ | बालसिंग भोपाल कणसे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १३३ | रामदास हरिचंद्र बमणे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १३४ | किशोर मोतीराम उगळे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १३५ | राजेश नाथाजी गवळे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १३६ | रावसाहेब हरीभाऊ मगरे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १३७ | बाळकृष्ण कचरु भारसाखळे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १३८ | सुरेश नामदेव खरात | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १३९ | कैलास पांडुरंग वाणी | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १४० | संतोष गोविंद जगे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १४१ | वैजिनाथ देवराव साबळे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १४२ | सुनिल दौलत अंभोरे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १४३ | घनशाम पांडुरंग जाधव | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १४४ | शंकर पांडुरंग भातपुडे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १४५ | बाबासाहेब भाऊराव भारसाखळे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १४६ | छगन तुळजाराम सलामपूरे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १४७ | सुभाष बाबुलाल हरणे | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १४८ | बबन पंडीतराव जाधव | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १४९ | राधाकिसन फकीरचंद बकले | दै.वे.वॉचमन | सुरक्षा विभाग | रु. २९५/ |
| १५० | वाजीद खान मन्सूर खान | गणेश कॉलनी | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| १५१ | इम्रान उल्ल खान फ़ैल उल्ला | कैसर कॉलनी | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| १५२ | फ़ारुख अली सराब अली | कैसर कॉलनी | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| १५३ | एहतेशाम अली हाश्मी | लोटा कारंजा | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| १५४ | मिर्झा रुफ़द बेग | (सेवक) शहा बाजार | शिक्षण विभाग | रु. २९५/ |
| १५५ | सुरेश धाबर्डे | दै.वे.चौकीदार | नगर सचिव विभाग (मा.सभापती, स्था.स.) | रु. २९५/ |

**करीता उपरोक्त एकुण १५५ दैनिक वेतनावरील कर्मचा-यांना दोन दिवसाची तांत्रिक खंड देऊन दिनांक ०३/०५/२०१२ ते ३१/१०/२०१२ पर्यंत सहा महिन्याची मुदतवाढ देण्याचा कार्योत्तर प्रस्ताव पुढील मान्यतेस्तव सादर.**

<u>ठराव</u>:

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील दैनिक/ठराविक वेतनावर कार्यरत असलेल्या वर्ग-४ संवर्गातील उक्त प्रस्तावातील अ.क्र. ०१ ते १५५ कर्मचारी यांना दोन दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.०३/०५/२०१२ ते दिनांक ३१/१०/२०१२ पर्यंत ०६ (सहा) महिन्याची मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र:८५६:**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्राकरीता सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षणाचे काम महानगरपालिकाकडून करण्यांत येत आहे. या कार्यवाहीअंतर्गत प्रत्यक्ष सर्वेक्षणाचे काम पुर्ण झालेले आहे. सदरील कामाकरीता प्रत्येक प्रशासकीय वार्ड करीता वार्ड अधिकारी चार्ज अधिकारी म्हणून नियुक्त आहे. सदर कार्यवाही अंतर्गत महाराष्ट्र शासनाचे निर्देशानुसार केलेल्या सर्वेक्षणाआधारे कुटूंबाची अंतरिम प्रारुप यादी प्रसिध्द करणे व त्यावर दावे आक्षेप मागविणे ही एक महत्वपुर्ण कार्यवाही आहे. यामध्ये प्रसिध्द प्रारुप यादी पाहून/ तपासून नागरीकांना दावे/ आक्षेप हरकत दाखल करता येतील. प्राप्त दावे/ आक्षेप हरकतीवर प्रथम स्तरीय अपिलीय अधिकारी यांचेकडून सुनावणी घेऊन निर्णय घेण्यात येईल. त्यांचे निर्णयावर अपिल करणेसाठी उच्च स्तरीय अपिलीय अधिकारी यांची नियुक्ती केली असून प्राप्त आक्षेप / दावे निकाली काढलेनंतर अंतिम यादी प्रसिध्द करण्यात येईल.

**सदर कार्यवाही प्रक्रिया :-**

१. प्रथम प्रारुप यादी प्रसिध्दीअंतर्गत वार्डनिहाय स्थानिक पातळीवर कुटूंबाचे अंतरिम यादी प्रसिध्द करण्यात येईल. सदर याद्या मनपा मुख्यालय, वार्ड कार्यालय, वार्डामध्ये एका ठळक जागी, वार्ड निहाय वार्डात एका ठळक जागी याप्रमाणे प्रसिध्द करण्यात येऊन तेथे पाहण्यासाठी उपलब्ध होतील.
२. याशिवाय या याद्या एन.आय.सी.,एस.ई.सी.सी. तसेच जिल्हाधिकारी, महानगरपालिकेच्या संकेत स्तरावर पी.डी.एफ. मध्ये उपलब्ध होती.
३. प्रसिध्द याद्या पाहून त्यासंबंधी आक्षेप हरकती दावे असल्यास त्यासाठीचे आक्षेप अर्ज नमुना / फॉर्म वार्ड कार्यालयात उपलब्ध असतील ते नमुना अ/ ब / क नुसार भरुन संबधित वार्ड कार्यालयात जमा करणे यासीठी २१ दिवसाच्या कालावधी राहील.
४. वार्ड निहाय वार्ड अधिकारी प्रथमस्तर अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्त आहे. ते प्राप्त दावे/ हरकती, आक्षेपास सुनावणी घेऊन निर्णय देऊन अपील निकाली काढतील. सदरील अपील सात दिवसाचे कालावधीत निकाली काढणेत येईल.

- **नमुना (अ), (ब), (क), व (ड) खालीलप्रमाणे आहे.-**

**नमुना (अ) :-** सर्वेक्षण दरम्यान कुटूंबाने सादर केलेल्या माहिती बाबत आक्षेप,

**नमुना (ब)** :- सर्वेक्षणात माझ्या व माझ्या कुटूंबातील अन्य सदस्यांच्या संबंधित प्रसध्दि नोंदी / नोंदीसमोर सुधारणा करण्याबाबत,

**नमुना (क) :-** सर्वेक्षण दरम्यान कुटूंबाचे सर्वेक्षण झाले नसल्यास, वगळल्याबाबत,

**नमुना (ड) :-** आक्षेप घेतलेल्या व्यक्तींना सुनावणीस उपस्थित राहण्याची नोटीस देण्यात येते.

५. प्रथम स्तर अपिलीय अधिकारी यांचे निर्णयाविरुध्द अपील करावयाचे झाल्यास द्वितीय स्तरीय अपिलीय अधिकारी यांचेकडे अपील करता येईल. प्रत्येक प्रशासकीय वार्ड करीता एक उच्चस्तरीय अधिकारी द्वितीय अपील अधिकारी नियुक्त करण्यांत आलेला आहे.

करीता उक्त कार्यवाही प्रक्रिया अवगत होणे व प्रक्रिया प्रसिध्द होणेसाठीच्या ठरावाकरीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्राकरीता सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षणाचे काम महानगरपालिकाकडून करण्यांत येत असुन कार्यवाहीअंतर्गत प्रत्यक्ष सर्वेक्षणाचे काम पुर्ण झालेले असल्याने सदरील कामाकरीता प्रत्येक प्रशासकीय वार्ड करीता वार्ड अधिकारी चार्ज अधिकारी म्हणून नियुक्त असून सदर कार्यवाही अंतर्गत महाराष्ट्र शासनाचे निर्देशानुसार केलेल्या सर्वेक्षणाआधारे कुटूंबाची अंतरिम प्रारुप यादी प्रसिध्द करणे व त्यावर दावे आक्षेप मागविणे ही एक महत्वपुर्ण कार्यवाही असल्याने यामध्ये प्रसिध्द प्रारुप यादी पाहून/ तपासून नागरीकांना दावे/ आक्षेप हरकत दाखल करता येतील. प्राप्त दावे/ आक्षेप हरकतीवर प्रथम स्तरीय अपिलीय अधिकारी यांचेकडून सुनावणी घेऊन निर्णय घेण्यात येईल. त्यांचे निर्णयावर अपिल करणेसाठी उच्च स्तरीय अपिलीय अधिकारी यांची

नियुक्ती केली असून प्राप्त आक्षेप / दावे निकाली काढलेनंतर अंतिम यादी प्रसिध्द प्रक्रिया अवगत होणे व प्रक्रिया प्रसिध्द होण्यास व सदर कार्यवाहीची प्रक्रिया प्रस्तावातील क्रमांक ०१ ते ०५ नुसार व प्रस्तावात **नमुना (अ), (ब), (क), व (ड)** प्रमाणे उक्त कार्यवाही प्रक्रिया अवगत होणे व प्रक्रिया प्रसिध्द होणेसाठीच्या ठरावास मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८५७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, हॅथवे एम.सी.एन. राष्ट्र एकता संस्था व महानगरपालिका औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यामाने आयोजित शहिद चंद्रशेखर आझाद यांच्या जयंती निमित्त सांस्कृतिक आणि स्वरक्षणार्थ क्रीडा स्पर्धाचे आयोजन करण्याबाबत तसेच या माध्यमातून युवकांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी शहरातील युवकांना मदत म्हणून रू.५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार रूपये फक्त) पर्यंत आर्थिक मदत म्हणून व प्रायोजकत्व स्वीकारणेसाठी राष्ट्र एकता संस्था महाराष्ट्र प्रदेश औरंगाबाद यांनी विनंती केली आहे. यासाठी सदर संस्थेने त्यांच्या संस्थेचे आवश्यक कागदपत्रे नोंदणी प्रमाणपत्र, पॅन कार्ड व मागील तीन वर्षाचे ऑडिट रिपोर्ट इ.कागदपत्रे सादर केले आहेत.

त्यानुसार सदर संस्थेस उपरोक्त प्रमाणे आर्थिक मदत रू.५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार रूपये फक्त) करण्यासंदर्भाने उपलब्ध आर्थिक तरतुदीच्या अधिन राहून सदर प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारर्थ सादर.

**संवाद:-**

मा.महापौर :- मंजूर.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हॅथवे एम.सी.एन. राष्ट्र एकता संस्था व महानगरपालिका औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यामाने आयोजित शहिद चंद्रशेखर आझाद यांच्या जयंती निमित्त सांस्कृतिक आणि स्वरक्षणार्थ क्रीडा स्पर्धेसाठी प्रस्तावात नमुद संस्थेस आर्थिक मदत रू.५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार रूपये फक्त) देण्यास नियमाप्रमाणे मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८५८:**

मोहल्ला औरंगपुरा येथील नाला जमिन यापूर्वी मा.सर्वसाधारण सभा दिनांक ३१-५-१९९७ च्या सभेत ठराव क्रमांक ३१/२९ ने झालेली मान्यता संबधाने श्री. शिवाई सेवा ट्रस्ट, मुंबई यांना दिनांक २०-१-२००० रोजी केलेल्या करारनामा आधारे भाडेपट्टयावर दिलेली आहे सदर करारनामानूसार भाडे पट्टयावर देण्यात आलेल्या जागेचा कालावधी ३० वर्षा करीता आहे

दरम्यान सदर संस्थेस नाला जमिन विकसीत करण्याचे व प्रत्यक्ष बांधकाम पूर्ण करण्याचे कालावधीमध्ये विविध कारणाने, न्यायप्रविष्ट प्रकरणाने विलंब झाल्याने /बराच कालावधी लागल्याने प्रत्यक्ष जागा वापरास कमी कालावधी उपलब्ध होत आहे व जागा भाडेपट्टयावर दिलेल्या कालावधीपैकी जो कालावधी विविध कारणामुळे व्यपगत (L'aps) झाला आहे तो विचारात घेऊन तेवढा कालावधी वाढवून दयावा म्हणून संस्थेची मागणी आहे.

सदर संस्थेस जागा प्रदान करणे संबधाने प्रथम विकास योजना आरक्षण विकासासाठी समुचित प्राधिकरण म्हणून महानगरपालिका ऐवजी शिवाई सेवा ट्रस्ट असा बदल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करण्यात आली तदनंतर मंजुर विकास योजना सुधारीत होऊन सुधारीत विकास योजना दिनांक १-६-२००१ पासून अंमलात आली सदर विकास योजना मंजुरीची अधिसुचना दिनांक १८-४-२००१ मध्ये शासन स्तरावरील मंजूर फेरबदल एम-४ अन्वये आरक्षण क्रमांक ५५ साठी दुकान केंद्र व वाहनतळामध्ये शिवाई सेवा ट्रस्ट (मुंबई )करीता १२२० चौ.मी क्षेत्रासाठी समुचित प्राधिकरण म्हणुन मान्यता झाली आहे या संबधाने सादर करण्यात आलेल्या बांधकाम परवानगी प्रस्तावा संबंधाने शासन मागदर्शनासाठी केलेला संदर्भ व तदनंतर संस्थेने शासनाकडे दाखल केलेल्या महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४७ अन्वये केलेल्या अपीला संबंधाने कार्यवाही होऊन त्यावर दिनांक १५-१०-२००४ रोजी निर्णय झाला हयामध्ये गेलेला कालावधी त्यानंतर प्रत्यक्ष बांधकाम सुरू करता त्यावर प्राप्त आक्षेप व मा.उच्च न्यायालय मुंबई

खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे याचिका क्रमांक ६९९३/२००५ ने दाखल प्रकरणी झालेल्या कार्यवाहीनंतर दिनांक १४-२-२००८ रोजी झालेला निर्णय यासाठी लागलेला कालावधी यामुळे सध्या अंतिम टप्प्यात असलेले बांधकाम पूर्ण करण्यास बराच कालावधी लागलेला आहे अशा कारणासंबधाने शिवाई सेवा ट्रस्ट यांनी व्यपगत (Laps)झालेला कालावधी वाढवून देण्याची मागणी केली आहे

करिता संस्थेची मागणी सदर भाडेपट्टयाच्या इतर अटी/शर्ती तशाच ठेवून वाढीव कालावधीस मान्यतेच्या निर्णयास्तव प्रस्ताव सादर.

मा.महापौर :मंजूर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला औरंगपुरा येथील नाला जमिन श्री. शिवाई सेवा ट्रस्ट, मुंबई यांना करारनामा आधारे ३० वर्षा करीता भाडेपट्टयावर देण्यात आली दरम्यान सदर संस्थेस नाला जमिन विकसीत करण्याचे व प्रत्यक्ष बांधकाम पूर्ण करण्याचे कालावधीमध्ये विविध कारणाने, न्यायप्रविष्ट प्रकरणाने विलंब झाल्याने /बराच कालावधी लागल्याने प्रत्यक्ष जागा वापरास कमी कालावधी उपलब्ध व जागा भाडेपट्टयावर दिलेल्या कालावधीपैकी जो कालावधी विविध कारणामुळे व्यपगत (Laps)झाला तसेच अंतिम टप्प्यात असलेले बांधकाम पूर्ण करण्यास बराच कालावधी लागला अशा कारणा संबधाने व संस्थेने शासनाकडे दाखल केलेल्या महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४७ अन्वये केलेल्या अपीला संबधाने कार्यवाही होऊन त्यावर दिनांक १५-१०-२००४ रोजी निर्णय झाला हयामध्ये गेलेला कालावधी त्यानंतर प्रत्यक्ष बांधकाम सुरू करता त्यावर प्राप्त आक्षेप व मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे याचिका क्रमांक ६९९३/२००५ ने दाखल प्रकरणी झालेल्या कार्यवाहीनंतर दिनांक १४-२-२००८ रोजी झालेला निर्णय यासाठी लागलेला कालावधी यामुळे सध्या अंतिम टप्प्यात असलेले बांधकाम पूर्ण करण्यास बराच कालावधी लागल्याने अशा कारणासंबधाने शिवाई सेवा ट्रस्ट यांनी व्यपगत (Laps) झालेला कालावधी वाढवून देणेबाबत केलेली मागणी व सदर भाडेपट्टयाच्या इतर अटी/शर्ती तशाच ठेवून वाढीव कालावधी मान्यतेस मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८५९:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीच्या वतीने अण्णाभाऊ साठे यांच्या कुटुंबीयांना आर्थीक मदत देणे बाबत विनंती केली आहे त्या अनुषंगाने अण्णाभाऊ साठे यांचा मुलगा कै. मधुकर अण्णाभाऊ साठे यांची पत्नी श्रीमती सावित्रीबाई मधुकर साठे यांना त्यांची हलाखीची स्थिती लक्षात घेता महानगरपालिकेच्या वतीने रू. १,००,०००/-(अक्षरी एक लक्ष रूपये फक्त)अशी आर्थीक मदत देणे बाबत सर्व पदाधिकारी यांनी सहमती दर्शविलेली आहे.

महाराष्ट्राच्या लोक जिवनात अण्णाभाऊ साठे यांचे योगदान व साहित्य क्षेत्रातील त्यांचे कार्य स्पृहणीय आहे त्यांच्या कुटूंबाची हलाखीची स्थिती लक्षात घेता त्यांच्या सुनबाई श्रीमती सांवित्रीबाई मधुकर साठे यांना रू. १,००,०००/- (अक्षरी एक लक्ष रूपये फक्त ) आर्थिक मदत देणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव मान्यतेस्तव व विचाराथ सादर.

मा.महापौर :मंजूर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीच्या वतीने अण्णाभाऊ साठे यांच्या कुटुंबीयांना आर्थीक मदत देणे बाबत विनंती केली त्या अनुषंगाने अण्णाभाऊ साठे यांचा मुलगा कै. मधुकर अण्णाभाऊ साठे यांची पत्नी श्रीमती सावित्रीबाई मधुकर साठे यांना त्यांची हलाखीची स्थिती लक्षात घेता महानगरपालिकेच्या वतीने रू. १,००,०००/-(अक्षरी एक लक्ष रूपये फक्त)ची आर्थीक मदत नियमानुसार देणेस मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद

.

## औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**कार्यक्रम पत्रिका क्रमांक - (४६)**

**दिनांक ०९.०८.२०१२ रोजी आयोजीत सर्वसाधारण सभेतील प्रश्नोत्तरे.**

**स.स. श्री.शिंदे राजू रामराव:**

**प्रश्न क्र.१३५ :**

**उत्तर: (प्रशासकीय अधिकारी)**

प्रशासकीय विभागांतर्गत बांधकामे सुरु असतांना देण्यात आलेल्या परवान्यांची तपासणी करुन नगररचना विभागाचा अभिप्राय घेऊन अनाधिकृत बांधकामाविरुध्द कायदेशिर कार्यवाही करण्यात येते. तसेच आरक्षित जागेवर अनाधिकृतपणे बांधकाम होत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा बांधकामाविरुध्द कार्यवाही करण्यात येते. न्यायप्रविष्ठ प्रकरणात, मा.न्यायालयाचा अवमान होणार नाही याची काळजी घेण्यात येते व विधी विभागाचा अभिप्राय घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येते. आरक्षित जागेवरील अनाधिकृत प्लॉटिंग वेळोवेळी मोहिमा राबवून निष्काशित करण्याची कार्यवाही करण्यात येते.

**उत्तर: (सहाय्यक संचालक नगर रचना )**

| प्रश्न | उत्तर |
|---|---|
| ०१. महापालिकेची बीड बायपास रोडलगत कुठपर्यत हद्य आहे या बाबत आपल्या विभागास संपूर्ण माहिती आहे का? असल्यास त्याबाबतची सविस्तर माहिती उपलब्ध करून देण्यात यावी. | औरंगाबाद महानगरपालिका विकास योजना वाढीव हद्द नुसार महानगरपालिकेची नियोजन प्राधिकरण म्हणून हद्द आहे. या बाबतचा नकाशा आपणांस संदर्भ क्र.२ अन्वये या विभागाने दिलेल्या पत्रासोबत देण्यात आलेला आहे. |
| ०२. बीड बायपास परिसरात महापालिकेची जेथपर्यंत हद्य आहेअशा हद्यीत बांधकाम परवानगी दिलेल्या आहे का ? असल्यास त्या बाबतची सविस्तर माहिती देण्यांत यावी. | बीड बायपास लगतच्या महानगरपालिका औरंगाबाद या नियोजन प्राधिकरणा अंतर्गत असलेल्या उक्त हद्दीमध्ये शासन मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) नुसार बांधकाम परवानगी / विकास परवानगी देण्यात येत आहेत व यापुर्वीही उक्त विकास योजने आधारे विकास परवानगी / बांधकाम परवानगी देण्यात आलेल्या आहेत. |
| ०३. बीड बायपास रोडवर जेथपर्यंत महापालिकेची हद्य आहे तेथे आरक्षित भुखंडावर सद्यस्थितीत सुरू असलेल्या बांधकामाबाबत आपल्या विभागास काही माहिती आहे का? या बांधकामास रितसर बांधकाम परवानगी देण्यांत आलेली आहे का? विना परवानगी होत आहे विना परवानगी जर बांधकामे होत असल्यास त्याविरूध्द काही कायदेशीर कार्यवाही करणार आहात का? कार्यवाही केली असल्यास त्या बाबतची माहिती उपलब्ध करून देण्यांत यावी. | उक्त मुद्दयामध्ये आपण निश्चित भुखंडा विषयी माहिती दिली नसल्याने भुखंडा वरील बांधकामाचे परवानगी बाबत ठोस सांगता येणार नाही. विना परवानगी बांधकामे बाबतची माहिती व कायेदशीर कार्यवाही प्रशासकीय विभागामार्फत होते. |
| ०४. मा.उच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरण असेल तर आरक्षणातील भुखंडावर बांधकाम परवानगी देता येते का ?दिलेली असल्यास त्याबाबतची सविस्तर माहिती देण्यांत यावी तसेच अशा प्रकारच्या आरक्षीत विविध भुखंडावर बांधकाम परवानगीसह सुरू असलेल्या बांधकामांची माहिती व विनापरवानगी सुरू असलेल्या बांधकामासंदर्भातील सविस्तर माहिती उपलब्ध करून देण्यांत यावी. | आपण उक्त मुद्दयात नमुद केलेल्या भुखंडा बाबत निश्चित माहिती दिल्यास त्याचे परवानगी अनुषंगाने अभिलेख तपासून आपणांस माहिती उपलब्ध करुन देता येईल. |
| ०५. मा.न्यायालयाचा अवमान होणार नाही अशा प्रकरणांत आपण काय कार्यवाही केली किंवा करणार आहात तसेच अशा अनधिकृतपणे /विना परवानगी होत असलेल्या बांधकामामध्ये महापालिकेचा मोठया प्रमाणात महसूल बुडत असून त्यावर काय कार्यवाही करणार आहात या बाबत व वरील प्रमाणे सविस्तर माहिती तात्काळ उपलब्ध करून देण्यांत यावी. | उक्त मुद्दा अनाधिकृत / विना परवानगी बांधकामा संदर्भाने असल्याने त्याबाबत कार्यवाही तसेच करीता आपणांस आपले संदर्भिय पत्राचे अनुषंगाने कळविण्यांत येते. |

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद

**विषय क्रमांक.८४२:**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की औरंगाबाद महानगरपालिका गुंठेवारी क्षेत्रातील प्रभाग क्र. ८७ उल्कानगरी मधील हनुमानगर, गारखेडा, जवारहनगर पोलीस स्टेशन मागील वसाहत गुंठेवारी क्षेत्रात येत असुन येथील वसाहतीमध्ये महानगरपालिकेने मुलभुत सोई देखील पुरविल्या आहेत परंतू या वसाहतीमधील काही भाग महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखडयामध्ये आरक्षण क्र. २३५ सांस्कृतिक सभागृह या आरक्षणाने बांधीत आहे परंतु या जागेवर १०० टक्के घरे बांधून झालेली असल्याने महानगरपालिकेस आरक्षणा करीता जागा उपलब्ध होणार नाही त्यामूळे सदर आरक्षण रद्य करून गुंठेवारी विकासामध्ये समाविष्ठ करणे आवश्यक आहे महानगरपालिकेने यापुर्वी अशाप्रकारची आरक्षणे रद्य केली आहेत

करिता आरक्षण क्रमांक २३५ सांस्कृतिक सभागृह सर्व्हे नं १, सि स नं १५३०४/पैकी मधील आरक्षण रद्य करून गुंठेवारी विकासात हा भाग समाविष्ठ करावा व गुंठेवारी विकास अधिनियमानुसार येथील वसाहतीमधील मिळकती नियमाधीन कराव्यात करीता प्रस्ताव सर्व साधारण सभेपूढे मंजुरीस्तव सादर.

सुचक :श्री.संजय जोशी अनुमोदक: श्री.महेश माळवतकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गुंठेवारी क्षेत्रातील प्रभाग क्र. ८७ उल्कानगरी मधील हनुमानगर, गारखेडा, जवारहनगर पोलीस स्टेशन मागील वसाहतीमधील काही भाग महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखडयामध्ये आरक्षण क्र. २३५ सांस्कृतिक सभागृह या आरक्षणाने बांधीत असुन तेथे १०० टक्के घरे बांधून झालेली असल्याने महानगरपालिकेस आरक्षणा करीता जागा उपलब्ध होणार नसल्याने आरक्षण क्रमांक २३५ सांस्कृतिक सभागृह सर्व्हे नं १, सि स नं १५३०४/पैकी मधील आरक्षण रद्य करून गुंठेवारी विकासात हा भाग समाविष्ठ करावा व गुंठेवारी विकास अधिनियमानुसार येथील वसाहतीमधील मिळकती नियमानुसार नियमाधीन करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.